सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, १५ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी?

## शरद पवारांचे अमित शहा यांना प्रत्युत्तर, तडीपार असताना मुंबईत आश्रयासाठी आले होते

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई दि.१४ जानेवारी : देशाच्या गृहमंत्रीपदी सरदार वल्लभभाई पटेल , यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण हे होते. या पदाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी या देशभक्तांनी अतिशय मोलाचे काम केले. सध्याच्या गृहमंत्र्यांची तुलना करताना 'कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी?, अशी परिस्थिती आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना प्रत्यूत्तर दिले.

गुजरातमधून तडीपार असताना हे मुंबईत आश्रयासाठी बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे विनंती केली होती, अशा व्यक्तीने जी विधाने केली त्याची नोंद पक्षात किती घेतली हे न सांगितलेले बरे, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

शिर्डी येथे झालेल्या भाजपाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात रविवारी अमित शहा यांनी शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यावर कडाडून टीका केली होती. पवारांचे गद्दारीचे राजकारण महाराष्ट्रातल्या जनतेने वीस फूट खाली गाढले ,अशा जहरी शब्दात हल्ला चढवला होता.

शरद पवार यांनी मंगळवारी मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पत्रकार परिषद घेऊन शाह यांचे नामोल्लेख न त्यांना प्रत्युत्तर दिले.

ते म्हणाले,' एकेकाळी गुजरात आणि महाराष्ट्र एकच राज्य होतं. गुजरातने उत्तम प्रशासकांची ओळख देशाला करून दिली. जी नावं मी तुम्हाला सांगितली त्यापैकी सर्वांचे एक वैशिष्ट्य होतं की त्यापैकी कोणालाही कधी त्यांच्या राज्यातून तडीपार केले गेले नव्हतं. तो प्रसंग कधी या राज्यकर्त्यांवर आला नाही.

या देशाच्या स्वातंत्र्यानंतर काही कर्तृत्वान व्यक्ती, स्वातंत्र्यानंतर अत्यंत प्रभावी आणि सर्व देशांचे राज्यांना एकत्रित करण्याचं काम सरदार पटेल यांनी केले. स्वातंत्र्यानंतर उत्तर प्रदेशात पंडित गोविंद वल्लभ पंत यांनी देशाचं गृहमंत्री म्हणून सर्वांनी अनुभवले. यशवंतराव चव्हाण आणि शंकरराव चव्हाण हे देशाचे गृहमंत्री होते. या पदाची गरीमा आणि प्रतिष्ठा या देशभक्तांनी ठेवली. शेजारचे गुजरात व महाराष्ट्र हे एक राज्य होते. बाबूभाई म्हणून गुजरातचे कर्तबगार प्रामाणिक आणि स्वच्छ मुख्यमंत्री होते. त्यानंतर माधवराव सोलंकी आणि चिमणभाई पटेल आदी उत्तम प्रशासक होते. यापैकी कुणालाही त्यांच्या राज्यातून तडीपार करण्यात आले नव्हते , असे सांगून ते म्हणाले. देशाच्या गृहमंत्र्यांनी भाषण करणे हा त्यांचा अधिकार आहे. पण थोडीफार माहिती घेऊन भाषण केली तर लोकांच्या मनात शंकेची स्थिती निर्माण होत नाही. १९७८ सालापासून त्यांना माझी माहिती झाली. मी १९५८ सालापासून मी राजकारणात असून ७८ साली हे व्यक्ती कुठे होते राजकारणात मला माहीत नाही. पण ७८ साली मी मुख्यमंत्री होतो. त्यात जनसंघाचे नेते उत्तमराव पाटील, हशू अडवाणी, प्रमिलाताई आदी कर्तृत्वान लोक, जनसंघाचे लोक माझ्या मंत्रिमंडळात होते. पुलोद सरकारची माहिती घेतली तर यातील सगळ्यांनी राज्यासाठी चांगलं योगदान दिलं. म्हणून मी मुख्यमंत्री असताना उत्तमराव पाटील गृहमंत्री उपमुख्यमंत्री होते. आणि आडवाणी नगरविकास खात्याचे होते. जनसंघाची पार्श्वभूमी असलेल्यांनी माझ्यासोबत काम केलं. संघात राहूनही वसंतराव भागवत आणि प्रमोद महाजन होते. ही सर्व नेतृत्वाची फळी भाजपने ७८नंतर दिली. नंतरच्या काळात देशात पक्ष वेगवेगळी सत्तेत होती. पण राजकीय पक्षातील नेत्यात सुसंवाद होता. वाजपेयी आणि आडवाणी यांचं नाव घेतलं पाहिजे. हे कर्तृत्ववान लोक होते. ते अतिरेकी भूमिका घेऊन समाजकारण किंवा राजकारण केले नाही, असे सांगून ते म्हणाले,' उदाहरण सांगायचं म्हणजे भूजला भूकंप झाला. मुख्यमंत्र्यांची बैठक पंतप्रधान वाजपेयी यांनी बोलावली. त्यात अतिवृष्टी आणि महापूर, भूकंपाचं धोरण ठरवण्यासाठीची जबाबदारी माझ्यावर सोपवली. मी विरोधी पक्षात असताना मंत्र्याचा दर्जा देऊन ते काम माझ्याकडे सुपूर्द केलं. ही पार्श्वभूमी भाजपच्या नेत्याकडे आहे. पण हल्लीच्या गृहमंत्र्यांनी माझ्यावर आणि उद्धव ठाकरेंवर जे भाष्य केले त्यावर न बोलले बरे. मराठीत एक म्हण आहे ' कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी ?असा टोला त्यांनी लगावला.

उद्धव ठाकरेंबाबत जी भूमिका घेतली ती लोकांनी पाहिली. ते सुद्धा त्यावर कधी तरी त्यांचे मत सांगतील. मला हे माहीत आहे, जेव्हा हे गृहस्थ गुजरातमध्ये राहू शकत नव्हते, अन् त्याला मुंबईत आसरा देण्यात आला होता. तेव्हा बाळासाहेबांच्या घरी जाऊन सहकार्य करावे ,अशी विनंती त्यांनी केली होती. अशा व्यक्तीने जी विधाने केली त्याची नोंद त्यांच्या पक्षात किती घेतली हे न सांगितलेले बरे, असे त्यांनी सांगितले.

### 'मविआ' घ्या नेत्यांची ८,१० दिवसात बैठक

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे त्याबाबत विचारणा केली असता पवार म्हणाले की,' येत्या आठ-दहा दिवसांमध्ये काँग्रेस उद्धव ठाकरे यांची शिवसेना व आमच्या पक्षाचे नेते एकत्र बसून आगामी निवडणुकाबाबतची भूमिका ठरवतील. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम्ही केजरीवाल यांच्या आप पक्षाला सहकार्य करण्याच्या भूमिकेत आहोत. त्याबाबत काँग्रेसच्या नेत्यांना विश्वासात घेऊन आमची भूमिका पटवून देऊ, असे त्यांनी सांगितले' शरद पवार गटाचे खासदार एनडीएत सहभाग घेऊनात ही अफवा प्रसारमाध्यमातूनच पसरवली जात असल्याचे त्यांनी एका प्रश्नावर सांगितले

# पानिपत शौर्य स्मारक सुधारणेसाठी महाराष्ट्र सरकार घेणार पुढाकार!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे पानिपतमधील शौर्यभूमीला वंदन

पानिपत : मंगल भूमीला वंदन करण्यासाठी येणे हे माझे सौभाग्य मानतो. जेव्हा संधी मिळेल, इथे येत राहीन. आम्ही शौर्य भूमीला वंदन करण्यासाठी आलो. शौर्य भूमीच्या ट्रस्टचे मनापासून आभार मानतो. आमचा इतिहास जिवंत ठेवण्याचे काम त्यांनी केले, याबाबत त्यांचे अभिनंदन करतो. या ठिकाणी मातृभूमीकरिता धारातीर्थी पडलेल्या मराठ्यांच्या शौर्याच संवर्धन करण्याचे काम ट्रस्ट करत आहे. ट्रस्टसोबत माझी चर्चा झाली आहे. येथील स्मारक अधिक चांगल्या पद्धतीने कसे करता येईल, त्यासाठी जे आवश्यक असेल, त्यात महाराष्ट्र सरकार पुढाकार घेईल, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.



कौरव-पांडव संगरतांडव द्वापारकाली होय अती। तसे मराठे गिलचे साचे कलित लढले पानपती।। मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पानिपत, हरियाणा येथे पानिपत शौर्य स्मारकास भेट दिली. यावेळी त्यांनी स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शूरवीरांना विनम्र अभिवादन केले आणि आदरांजली वाहिली. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना पत्रकारांच्या प्रश्नांनाही सविस्तरपणे उत्तरे दिली. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर पानिपतला येणारे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी भगव्या झेंड्याखाली आम्हाला सर्वांना एकत्र आणले आणि भारताच्या तिरंग्याखाली एकत्र येणे गरजेच आहे. पानिपत ही मराठी माणसाची एक भळभळती जखम आहे. त्याचवेळी पानिपत मराठी माणसाचा अभिमान आहे. ज्या प्रकारे मराठ्यांनी पानिपतच्या युद्धात शौर्य दाखवले, ही मराठ्यांची वीरता आहे, शौर्य आहे. पानिपत एक अशा प्रकारची लढाई आहे, त्यात जरी तांत्रिकदृष्ट्या पराजय झाला असला, तरी मराठी हरले नाहीत. त्यांनी आपले शौर्य सातत्याने इतके वाढवले की, त्यानंतर भारतावर अशा प्रकारे आक्रमण करण्याची हिंमत कोणाची झाली नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

# दक्षिण आफ्रिकेतील सोन्याच्या खाणीत अडकलेल्या 100 कामगारांचा मृत्यू

प्रिटोरिया, १४ जानेवारी : दक्षिण आफ्रिकेतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दक्षिण आफ्रिकेतील स्टिलफोंटेनजवळ बफेल्सफोंटेन येथील सोनेखाणीतील १०० कामगारांच्या मृत्यू झाल्याची मोठी घटना घडली आहे. या घटनेने संपूर्ण जगाला हादरवून टाकले आहे. हे सर्व कामागार सोन्याच्या खाणीत बेकायदेशीरपणे उत्खनन करत होते. तिथे अनेक कामगार अडकले होते. आता या कामागारांचा भूकेने तडफडून मृत्यू झाला असल्याचे माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण आफ्रिकेतील स्टिलफोंटेन शहराजवळील बफेल्सफोंटेन याठिकाणी असलेल्या सोन्याच्या खाणींमध्ये सुमारे १०० कामगार अडकले होते. खाणीत अडकलेल्या कामगारांना गेल्या काही महिन्यांपासून अन्न आणि पाण्याचा पुरवठा बंद होता. जेव्हा त्यांना बाहेर काढले तेव्हा ते भूकेने आणि तहानेने मरण पावले असल्याची धक्कादायक माहिती उघड झाली. या घटनेची माहिती कामगारांनी मोबाईल फोनद्वारे पाठवलेल्या व्हिडिओवरून मिळाली, ज्यामध्ये प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले मृतदेह दिसत आहेत. याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. माइनिंग अफेक्टेड कम्युनिटीज यूनाइटेड इन एक्शन ग्रुपने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत २६ जणांना जिवंत बाहेर काढण्यात आले असून १८ मृतदेह बाहेर काढले आहेत. मात्र, खाण इतकी खोल आहे की आत अजूनही सुमारे ५०० कामगार अडकले असण्याची शक्यता आहे.खाणीची खोली २.५ किमी असल्याचे सांगितले जाते. या घटनेत पोलिस आणि कामगारांमध्ये मोठा संघर्ष उभा राहिला. पोलिसांनी खाण सील करण्याचा प्रयत्न केल्यानंतर कामगारांमध्ये संताप उसळला. अटकेच्या भीतीमुळे कामगार बाहेर येत नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे, तर कामगारांचा आरोप आहे की पोलिसांनी त्यांचे दोरखंड काढून टाकले ज्यामुळे ते बाहेर येऊ शकले नाहीत.

# पालकमंत्र्यांची नावे १६ जानेवारीपर्यंत जाहीर होणार- चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर , १४ जानेवारी : राज्याच्या सर्वच जिल्ह्यांना पालकमंत्रिपदाची प्रतीक्षा असून, अद्यापदेखील हा तिढा सुटलेला नाही. आता १५ ते १६ जानेवारीपर्यंत पालकमंत्रिपद विषयाला अंतिम स्वरूप मिळण्याची शक्यता आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी (१३ जानेवारी) नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी मागील आठवड्यातच केवळ दोन दिवसांतच पालकमंत्र्यांची नावे जाहीर होतील, असा दावा केला होता. मात्र, अद्यापपर्यंत नावांची घोषणा झालेली नाही. यावर आता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलेकि, 'महायुतीतील पालकमंत्र्यांचा विषय मार्गी लागलेला आहे. १५ ते १६ जानेवारीपर्यंत पालकमंत्रिपद विषयाला अंतिम स्वरूप मिळण्याची शक्यता आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर आमच्या आतापर्यंत दोन ते तीन बैठका झाल्या आहेत.कोणाला कुठल्या जिल्ह्यात नियुक्त करायचे याचा निर्णय अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे २६ जानेवारीला झेंडावंदन कोणी करायचे यावर तोडगा निघालेला असेल,''

पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले, ''स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजप तयार आहे. जेव्हा निवडणुका लागेल त्यावेळी आम्ही पूर्ण ताकदीने मैदानात उतरू. कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांबरोबर जाऊन काम करू. भाजप क्रमांक एकचा पक्ष आहे. असे असले तरी महायुती म्हणून आम्ही निवडणुकीत पुढे जाऊ.'' असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच भाजपकडून सदस्यता नोंदणीवर भर देण्यात येत आहे. दीड कोटी सदस्य संख्येचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १५ दिवसांत ही संख्या गाठण्यात यश येईल. त्यानंतर बूथप्रमुख, तालुकाध्यक्ष, जिल्हाध्यक्षांची निवड करण्यात येईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

# कामे गुणवत्ताक पणे पूर्ण करा; आ अब्दुल सत्तार यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१४, आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली अंभई ता. सिल्लोड येथे सर्व शासकीय विभाग प्रमुखांची मतदारसंघातील विकास कामांबाबत आढावा बैठक संपन्न झाली. मतदारसंघातील सर्व विकास कामे गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेत पूर्ण व्हावीत तसेच मार्च महिन्यात निधी लॅप्स होवून विकास कामांना मुदतवाढ मागण्याची वेळ येवू नये याची अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी यासह मंजूर व प्रलंबित विकास कामे सुरू करून नवीन कामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले.



बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिरसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार संजय भोसले ( सिल्लोड ), मनीषा मेने ( सोयगाव ) , सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरीकर, उपविभागीय अभियंता विजयकुमार सोनुने, अजय टाकसाळ, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस.बी. काकड ,उपविभागीय अभियंता अशोक शाखावार,जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन विभागाच्या तहसीलदार रुपा चित्रक, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार ( सिल्लोड ) , दादाराव आहिरे ( सोयगाव ), जलसंपदा विभागाच्या श्रीमती शहापूरे, जलसंधारण विभागाचे अभियंता राजधर दांडगे, पाणी पुरवठा विभागाचे अभियंता आप्पासाहेब काटकर, गजानन जंजाळ, वीज वितरण विभागाचे कार्यकारी अभियंता अविनाश राऊत, पोलीस निरीक्षक शेषराव उदार, विजयसिंह राजपूत आदिंसह शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांनी खातेनिहाय विकास कामांचा आढावा घेतला. जिल्हा परिषद बांधकाम तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत बरेचसे कामे प्रलंबित असल्याने आ. अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. जे काम सुरू झालेले नाही किंवा करता येत नाही त्याचं नेमकं कारण काय असल्याचा अहवाल तातडीने सादर करा अशा सूचना देखील आमदार अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या .

सार्वजनिक बांधकाम विभागाचे किती प्रस्ताव वन विभागाकडे प्रलंबित आहेत याचा अहवाल तातडीने तयार करा. सिल्लोड व सोयगाव तालुक्यातील ज्या शासकीय इमारतीचे कामे अंतिम टप्प्यात आहेत त्या इमारतींचे लोकार्पण सोहळा साठी नियोजन करणे, उपविभागीय अधिकारी यांनी सर्व अधिकारी यांची दर पंधरा दिवसाला सुरू असलेल्या विकास कामांच्या प्रगती बाबत आढावा घ्यावा, जिल्हाधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे महसुली तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रभावी नियोजन करणे, श्रीक्षेत्र मुर्डेश्वर येथे मंजूर असलेल्या ४५ कोटी रुपयांच्या निधी मागणीबाबत तातडीने प्रस्ताव सादर करणे, तसेच शिवस्मारक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क तसेच संत सेवालाल महाराज येथे वाढीव जमीन व वाढीव निधी प्रस्ताव सादर करण्याचे काम कुठपर्यंत आले यावर आमदार अब्दुल सत्तार यांनी सविस्तर आढावा घेत अधिकाऱ्यांना निर्देशित केले.

# काश्मीरमध्ये लॉस एंजेलिस आगीची पुनरावृत्ती; दोन गावे जळून खाक

काश्मीर : अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यातील लॉस एंजेलिस मधील आगीची घटना ताजी असतानाच आता काश्मीर मध्ये सुद्धा या घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. लॉस एंजेलिसमध्ये लागलेली आग आंतरराष्ट्रीय चिंतेचा विषय ठरली आहे. काश्मीरमध्ये सध्या कडाक्याची थंडी पडत असतानाही लागलेल्या या भीषण वणव्यात किश्तवाड येथील दोन गाव जळून खाक झाले आहेत. सुदैवाने इथे कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणावर वित्त हानी झाली आहे.



काश्मीरच्या किश्तवाड येथे सध्या कडाक्याच्या थंडीमुळे तापमान थंड झालेले आहे. या परिसरात सातत्याने हिमवृष्टी होत आहे. मात्र एवढ्या थंडीतही ही भीषण आग लागली आहे. किश्तवाडमधील दुर्गम भागात वसलेल्या बाडवन येथील मार्गी आणि मालवन गावांमध्ये ही आग लागली आहे. या भीषण वणव्यात अनेक घरं जळून खाक झाली आहेत. तर शेकडो लोकांना या आगीचा फटका बसला आहे. लोकांनी स्थानिक पातळीवर बचावकार्य करून अनेकांचे प्राण वाचवले आहेत.स्थानिकांकडून या आगिवर नियंत्रण ठेवण्याचं काम अजूनही सुरूच आहे. असे असले तरी या दुर्घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र ही आग कशामुळे लागली याचे कारण अस्पष्टच आहे.

# एशियन व ऑलिम्पिक स्पर्धेच्या समावेशाचा खोखो महासंघाचा मानस : अध्यक्ष सुधांशु मित्तल

नवी दिल्ली, १४ जानेवारी-

२०३० मध्ये होणाऱ्या एशियन चॅम्पियनशिप आणि २०३२ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक या प्रमुख स्पर्धांमध्ये खो-खोचा समावेश करण्याचा भारतीय खो-खो महासंघाचा मानस असल्याचे महासंघाचे अध्यक्ष सुधांशु मित्तल यांनी सांगितले.

नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या पहिल्या खो-खो विश्वचषकाच्या उद्घाटन सामन्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. मित्तल म्हणाले, खो-खो सध्या ५५ देशांमध्ये खेळला जात आहे. मात्र, ऑलिम्पिकमध्ये समावेशासाठी हा खेळ ७५ देशांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. आमचे उद्दिष्ट आहे की, ९० देशांमध्ये हा खेळ पोहोचवून त्याचा अधिकाधिक विस्तार करायचा. जेणेकरून आम्हाला ऑलिम्पिकमध्ये सहज सहभाग मिळेल.

सर्वाधिक देश सहभागी असलेला विश्वचषक यापूर्वी कोणत्याही खेळचा विश्वचषक सुरु (पहिला) होताना १४ पेक्षा अधिक देशांचा सहभाग नव्हता. खो-खो खेळाने एक नवीन विश्वविक्रम करत या पहिल्याच विश्वचषकात २३ देशांचा सहभाग झाला आहे. तसेच पुरुषांचे २० तर महिलांचे १९ संघ या स्पर्धेत खेळत आहेत हा सुध्दा एक विश्वविक्रमच आहे.

खो-खोच्या प्रगतीचा इतिहास

मित्तल यांनी खो-खोच्या वाढीसाठी झालेल्या प्रयत्नांवर




प्रकाश टाकला. आज पहिला खो-खो विश्वचषक साकारत आहे, ही संपूर्ण खो-खो कुटुंबाची मोठी मेहनत आहे. खेळाडू, प्रशिक्षक आणि संघटक व संघटनांच्या अथक प्रयत्नांमुळे हा खेळ आता घराघरांत पोहोचत आहे. केंद्र शासनाने तीन हजार खेळाडूंना नोकरीची संधी दिली असून, अल्टिमेट खो-खो लीगने हा खेळ लोकप्रिय केला आहे, असेही त्यांनी नमूद केले.खो-खोचा जागतिक विस्तार आणि भवितव्य

पहिल्या खो-खो विश्वचषकाच्या यशस्वी आयोजनासोबतच हा खेळ जागतिक व्यासपीठावर स्वतःची जागा निर्माण करत आहे. महासंघाच्या या पुढाकारामुळे खो-खो खेळासाठी नव्या संधी आणि आव्हाने समोर येत आहेत.

टीम इंडियासे बचके रहना : कर्णधार वाईकर

पहिल्या दिवसाच्या उद्घाटन सामन्यात भारताने नेपाळवर ४२-३७ असा विजय मिळवला. मध्यंतरापर्यंत भारत केवळ चार गुणांच्या आघाडीवर होता (२४-२०), मात्र दुसऱ्या डावात दमदार खेळ करून भारताने सामना जिंकला. भारताचा कर्णधार प्रतीक वाईकर यांनी सामन्यानंतर प्रतिक्रिया देताना सांगितले, पहिलाच सामना असल्यामुळे संघावर थोडे प्रेशर होते. सामना लाईव्ह असल्याने संपूर्ण जग पाहत होते. नेपाळने अप्रतिम खेळ केला, ज्यामुळे आमच्यावर दबाव निर्माण झाला. आमच्या आक्रमणात काही कमतरता होत्या, आणि संरक्षणातही सुधारणा करण्याची गरज आहे. पण इतर संघांना आम्ही हेच सांगू कि 'टीम इंडियासे बचके रहना!'

प्रशिक्षक अश्वनीकुमार शर्मा म्हणाले, प्रेक्षकांचा जोश जबरदस्त होता. पुढील सामन्यांमध्ये आम्ही चुका सुधारू व आम्हाला अजून मोठे विजय मिळवायचे आहेत हे स्पष्ट केले.

# गुंतवणूकीत राहणे ही दीर्घकालीन सेवानिवृत्तीच्या यशाची गुरुकिल्ली

पुणे : दीर्घकालीन सेवानिवृत्ती यशाची गुरुकिल्ली सातत्याने गुंतवणूकीत राहण्यात आहे. ज्याप्रमाणे बाजारपेठा मूळतः अस्थिर आणि अल्पावधीत सामान्यतः अप्रत्याशित असतात, त्याचप्रमाणे त्यांचे मूल्य कालांतराने वाढत जाते. स्थिर गुंतवणुकीचा दृष्टीकोण व्यक्तींना चक्रवाढ व्याज, विविधीकरण आणि दीर्घकालीन बाजारातील ट्रेंड पकडण्यास आणि महागाईपासून त्यांच्या पोर्टफोलिओचे संरक्षण करण्यास मदत करते. रणनीती बनवण्याचा हा शिस्तबद्ध दृष्टिकोण सेवानिवृत्तीसाठी एक मजबूत आर्थिक पाया प्रदान करतो, असे बंधन एएमसीचे विक्री व विपणन प्रमुख गौरब परिजा यांचे म्हणणे आहे.

गौरब परिजा म्हणाले की, बाजारात गुंतवणूकीत राहण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे चक्रवाढ. जेव्हा तुमची गुंतवणूक स्वतःहून परतावा मिळवू लागते, तेव्हा तुमच्या गुंतवणुकीची झपाट्याने वाढ होते. उदाहरणार्थ, तुम्ही वार्षिक पाच टक्के व्याजदराने १००० रुपयाची गुंतवणूक केल्यास, पहिल्या वर्षाच्या शेवटी तुमच्याकडे १०५० असतील. दुसऱ्या वर्षी तुम्ही केवळ १००० वरच नाही तर पहिल्या वर्षी व्याज म्हणून मिळवलेल्या ५० रुपयांवरसुद्धा व्याज मिळून तुम्ही तुमच्या खात्यातील शिल्लक ११०२.५० वर घेऊन जाऊ शकता. या प्रक्रियेला पुरेसा वेळ द्या आणि या चक्रवाढ परिणामामुळे तुमचे गुंतवणुकीचे मूल्य लक्षणीयरीत्या वाढू शकते, विशेषतः जर तुम्ही लवकर सुरुवात केली आणि वारंवार पुन्हा गुंतवणूक केली तर याचा अधिक फायदा होतो.

परिजा यांच्या मते, महागाई हा सेवानिवृत्तीच्या नियोजनातील आणखी एक महत्त्वाचा घटक आहे, कारण जेव्हा किंमती वाढत असतात, तेव्हा पैशाची क्रयशक्ती सतत कमी होते. जर तुमची गुंतवणूक किमान महागाईच्या दराने वाढली नाही, तर तुमच्या बचतीचे मूल्य कमी होते. चांगल्या वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओमध्ये गुंतवणूक केल्याने तुम्हाला अशा प्रकारच्या क्षरणापासून संरक्षण मिळते आणि कालांतराने तुमच्या पैशाचे मूल्य कायम राहते, याची खात्री मिळते. भावनिक गुंतवणूक करणे कठीण आहे आणि जेव्हा बाजार खाली येतो तेव्हा ते खरोखर वाईट असू शकते. तुमच्या गुंतवणुकीचे मूल्य कमी होत असल्याचे पाहून काळजी वाटणे स्वाभाविक आहे, परंतु जोशात येऊन निर्णय घेणे महागड्या चुका ठरू शकतात.

ते म्हणाले, काही गुंतवणूकदार बाजारातील मंदीच्या वेळी घाबरतात आणि त्यांची युनिट्स विकतात, ज्यामुळे तोटा होतो. तर काही जण बाजारातील तेजीचा पाठलाग करतात. कारण आपण काही चुक तर करीत नाही ना, अशी भीती असते. त्यामुळे गुंतवणुकीत राहणे तुम्हाला या प्रतिक्रिया टाळण्यास मदत करते. एक शिस्तबद्ध गुंतवणूकदार काळजीपूर्वक तयार केलेल्या योजनेचे अनुसरण करतो; अल्पकालीन भावनांच्या आधारे तो कोणताही निर्णय घेत नाही. रिटायरमेंट सेव्हिंग ही मॅरेथॉन आहे, स्प्रिंट रेस नाही.

दीर्घकालीन सेवानिवृत्ती यशाची गुरुकिल्ली म्हणजे बाजारात गुंतवणूक करणे. हे तुम्हाला चक्रवाढीची शक्ती काबीज करण्यास, बाजारातील चढ-उतारांना सामोरे जाण्यास, भावनेने प्रेरित निर्णय घेण्यास टाळण्यास, महागाईपासून स्वतःचे संरक्षण करण्यास आणि पोर्टफोलिओचे वैविध्य राखण्यास मदत करते. संयम व सातत्य हे यशस्वी आणि आरामदायी निवृत्तीचे प्रमुख सहयोगी आहेत. अशा तत्त्वांसह, तुम्ही आधीच वित्तीय बाजारातील गुंतागुंत समजून घेण्याच्या आणि चिरस्थायी आर्थिक स्थिरता प्राप्त करण्याच्या मार्गावर निश्चितच असाल, असे गौरब परिजा यांचे म्हणणे आहे.

## तहसील कार्यालय फेरफार आदालत! नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन तहसिल विद्याचरण कडवकर यांनी केले

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१२ जानेवारी - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या समन्वयाने कन्नड तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनी संपूर्ण तालुक्यात दि.१५ रोजी सकाळी १० वा. पासुन फेरफार अदालत व सामान्य नागरीकांसाठी महसूल विभागा संदर्भात विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहे . यात महसूल अधिकारी कार्यालय करंजखेडा ,चापानेर ,चिंचोली, चिकलठाण, देवगाव रंगारी ,नागद ,हतनुर ,नाचनवेल, पिशोर तसेच कन्नड येथील मिटींग हॉल येथे फेरफार आदलतिचे आयोजन करण्यात आले होते यात तालुक्यातील सर्व शेतकरी, मजुर, दिव्यांग, बंधु-भगिनी, सामान्य नागरीकांना त्यांच्या सातबारा वरील बोजा ,विहीरीचे, मालकी हक्काचे प्रलंबित फेरफार , नावातील दुरूस्ती, क्षेत्रातील दुरूस्ती, फेरफारबाबत इत्यादी दुरूस्ती तसेच ज्या नागरीकांना रेशन कार्डबाबत नाव वाढविणे, नाव कमी करणे, शिधापत्रिकाची मागणी करणे यासह तहसील कार्यालय संबंधी सर्व कामे या अदालतीतून एका छत्राखाली करण्यात येणार असून विविध नमुन्यात अर्ज सादर करून शेतकरी तसेच नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे बारामती येथे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.१४, (विमाका) :- महाराष्ट्र राज्यामध्ये देशी खेळ प्रचंड लोकप्रिय आहेत.लाल मातीतील मर्दानी खेळ म्हणून कबड्डी हा खेळ महाराष्ट्राच्या कानाकोप-यात लोकप्रिय आहे..महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी या दोन्ही विभागामध्येकबड्डी खेळ मोठ्या प्रमाणावर खेळला जातो. कबड्डी खेळामध्ये शक्ती,युक्ती व चपळता आणी दम यांचा चित्तथरारक संगम या खेळामध्ये दिसून येतो.त्यामुळेच महाराष्ट्राच्या गावा गावांमध्ये या खेळाची लोकप्रियता प्रचंड असून ती दिवसेंदिवस वाढत आहे.

महाराष्ट्र राज्यातील कबड्डी खेळाडूंना प्रेरणा मिळावी व त्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्याची संधी प्राप्त व्हावी तसेच कबड्डी क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचा खेळ व त्यांचे कौशल्य पाहाता यांवे यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत राज्यस्तरावरील पुरुष व महिलांसाठी दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात येते.

सन २०१२ पासून कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नागपूर, अहमदनगर (अहिल्यानगर) व ठाणे या जिल्ह्यामध्ये या स्पर्धेचे आयोजन झालेले आहे. दि.१५ जानेवारी हा दिवस ऑलींपीकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो या दिनाचे औचित्य साधून क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २३ वी छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२४ - २५ चे आयोजन दि.१५ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत रेल्वे मैदान,बारामती जि.पुणे येथे होत आहे.

बारामती शहर आणी परिसरांत कबड्डी या खेळाची अनेक अद्ययावत प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित असून या परिसरातून अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू घडलेले आहेत.बारामती शहराला दुस-यांदा या क्रीडा स्पर्धा आयोजनांचा बहुमान प्राप्त झालेला आहे यापुर्वी सन २००९-१० मध्ये या स्पर्धेचे अत्यंत दिमाखदार आयोजन या शहराने केलेले होते.

दि.१५ ते १९ जानेवारी २०२५ याकालावधीत आयोजित या स्पर्धेत प्रो कबड्डी स्टार-अजित चौहान, शिवम पठारे, प्रणय राणे, आकाश शिंदे, संकेत सावंत, विशाल ताठे, शंकर गदई, सुनील दुबिले, जयेश महाजन, श्रेयस उबरदंड, आम्रपाली गलांडे, सलोनी गजमल, रेखा सावंत, हरजीत संधू, सोनाली शिंगटे, दिव्या गोगावले, समरीन बुरोंडकर, मंदिरा कोमकर, यशिका पुजारी, कोमल देवकर या पुरुष व महिला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा दर्जेदार व कौशल्यपुर्ण खेळ पाहण्याची सुवर्णसंधी पुणे जिल्ह्यातील कबड्डी रसिकांना प्राप्त होणार आहे. व उदयोन्मुख खेळाडूंना या खेळाडूंचे कौशल्य आत्मसात करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६९/२०२४

१. बलदेव सुपडु पुरी (शिंदे) वय ६० वर्षे, भंदा शेती रा. आमखेडा, ता. सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन एस. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रूखमाबाई सुपडू पुरी (शिंदे) यांचा दि. २७/१२/२००९ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे एकमेव वारस आहे असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत रूखमाबाई सुपडू पुरी (शिंदे) यांचे वारस असुन त्यांना मयत रूखमाबाई सुपडू पुरी (शिंदे) यांच वारस प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि.९/७/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता.८/४/२०२४

विभागीय लिपीक. सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.

---

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरागाबाद,**

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ०२/२०२४

अर्जदार : १) संगीताबाई प्रमोद राजपुत वय ५२ वर्षे धंदा शेती, २) मंगलसिंग प्रमोद राजपुत (पाटील) वय ३३ वर्षे धंदा- शेती ३) सोमसिंग प्रमोद राजपुत वयः ३१ वर्षे धंदा शेती, सर्व रा. मोहलाई ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

// विरुध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. गहाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे प्रमोद चंद्रसिंग राजपुत दिनांकः १८/०७/२०२० ला मौजे मोहलाई ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणप्रत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक:-१८/०२/२०२५)

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक:-१४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.

---

### जाहीर प्रगटन

पु. ता. २८/०२/२०१५

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.व्ही. डी. पाटील साहेब) क.स्तर यांचे कोर्टात**

दि.किरकोळ अर्ज क. २२/२०२५

अर्जदार : १. श्रीमती. पद्माबाई भ्र. सोनाजीराव सपकाळ पाटील वय-६० धंदा- घरकाम रा-टाकळी अं.ता. कन्नड जि. औरंगाबाद २. श्री.अभय पि.सोनाजीराव पाटील (सपकाळ) वय-४६ धंदा- नोकरी रा-टाकळी अं.ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. फ्लॅट क.२ गुरू वैभव अपार्ट. उल्कानगरी ता.जि. औरंगाबाद ३. सौ. अनुपमा भ्र. कैलास ठोंबरे वय-४४ धंदा- घरकाम रा. प्लॉट क. २ जे-सेक्टर वरदराज निवास देवेगिरी हिल्स शिवाजीनगर औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ३ यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती अर्जदार क. २ व ३ यांचे वडील मयत नामे सोनाजीराव पि. पुंजाजी सपकाळ पाटील यांचा मृत्यु दि. १९/१०/२०२४ रोजी मौजे टाकळी अं. ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून मयतास केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत सोनाजीराव पि.पुंजाजी सपकाळ पाटील यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय, निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार क. १ ते ३ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ३ हे मयत सोनाजीराव पि. पुंजाजी सपकाळ पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्रग्रह्य धरला जाणार नाही.

करीता आज दि. ०९/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपिक सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड

---

### जाहीर प्रगटन

पु. ता. ०३/०३/२०२५

मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.व्ही. डी. पाटील साहेब) क.स्तर यांचे कोर्टात

दि.किरकोळ अर्ज क. ३१/२०२४

अर्जदार : श्री. दत्तु पि.कारभारी त्रिभुवन वय-४३ धंदा- शेती रा.- गव्हाली ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार यांची आई मयत नामे ताराबाई भ्र. कारभारी त्रिभुवन यांचा मृत्यु दि.०८/०२/२०१४ रोजी मौजे गव्हाली ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून अर्जदाराचे वडील नामे कारभारी पि.लक्ष्मुण त्रिभुवन हे देखील दि. २०/०८/२०२४ रोजी मयत झालेले आसुन मयतास केवळ अर्जदार हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत ताराबाई भ्र.कारभारी त्रिभुवन यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय, निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत ताराबाई भ्र. कारभारी त्रिभुवन यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्रग्रह्य धरला जाणार नाही.

करीता आज दि. १४/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपिक सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड

---

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचा न्यायालयात.**

दि.कि.अर्ज. क्र : १५/२०२५

पुढील तारीख : १८/०२/२०२५

अर्जदार : मीराबाई भ्र. मनोज ठेगडे व ईतर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. शुभम रामदास राऊत व ॲड. रामदास दगडुजी राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत मनोज पिता रामहरी ठेगडे हे दि. १६/०५/२०२४ रोजी मौजे हतनुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहे. मनोज पिता रामहरी ठेगडे हे मयत झाल्या मुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणून अर्जदार यांना अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी. ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्राची आवश्यक आहे व तशी मागणी अर्जात केली.

त्या अर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो आदेश करण्यात याईल व तसेच कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात याईल.

सबब हे जाहीर प्रगटण

दिः ०३/०१/२०२५

आदेशावरून

लिपिक सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड

---

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-७७५

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : बिस्मिल्ला बी सदरूद्दिन शेख (बिस्मिल्ला शेख गुलाम) रा ८० सिराज मंजिल अजंता चौक जवळ जळगाव ता जि जळगाव

विरूध्द

गैरअर्जदार : ग्राम पंचायत कार्यालय आंबा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः बिस्मिल्ला वी सदरूद्दिन शेख (बिस्मिल्ला शेख गुलाम) च्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः बिस्मिल्ला बी सदरूद्दिन शेख (बिस्मिल्ला शेख गुलाम) चा जन्म दिनांक २३-०७-१९५५ रोजी आंबा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः बिस्मिल्ला बी सदरूद्दिन शेख (बिस्मिल्ला शेख गुलाम) चा जन्म दिनांक २३- ०७-१९५५ रोजी आंबा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः बिस्मिल्ला बी सदरूद्दिन शेख (विस्मिल्ला शेख गुलाम) चा जन्म दिनांक २३-०७-१९५५ रोजी आंबा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २३-०७- १९५५ रोजी आंबा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

### जाहीर प्रगटन

**श्रीमती काटकर मॅडम २ रे सह दिवाणी न्यायाधीश मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचा न्यायालयात.**

दि.कि.अर्ज. क्र : ३८९/२०२४

पुढील तारीख : १७/०१/२०२५

अर्जदार -: साखरबाई भ्र चांगदेव इंगळे व ईतर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे

कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. शुभम रामदास राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत चांगदेव पिता बारकू इंगळे हे दि. ०७/०६/२०२१ रोजी मौजे शिरोडी औरळा कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहे. चांगदेव पिता बारकू इंगळे हे मयत झाल्या मुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणून अर्जदार यांना अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी.ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्राची आवश्यक आहे व तशी मागणी अर्जात केली.

त्या अर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो आदेश करण्यात याईल व तसेच कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात याईल.

सबब हे जाहीर प्रगटण

दिः ३१/१२/२०२५

आदेशावरून

लिपिक सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड.

---

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचा न्यायालयात.**

दि.कि.अर्ज. क्र : ३७८/२०२५

पुढील तारीख : २४/०१/२०२५

अर्जदार -: उशाबाई भ्र. भुजंगराव शिंदे व ईतर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. शुभम रामदास राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत भुजंगराव पिता दाजीबा शिंदे हे दि. ०९/१२/२०२३ रोजी मौजे भारंबा कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहे. भुजंगराव पिता दाजीबा शिंदे हे मयत झाल्या मुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणून अर्जदार यांना अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी.ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्राची आवश्यक आहे व तशी मागणी अर्जात केली.

त्या अर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो आदेश करण्यात याईल व तसेच कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात याईल.

सबब हे जाहीर प्रगटण

दिः ०१/०१/२०२५

अदेशावरून

लिपिक सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड.

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचा न्यायालयात.**

दि.कि.अर्ज. क्र : ४०५/२०२५

पुढील तारीख : १२/०२/२०२५

अर्जदार : रामेश्वर पिता सुखदेव मोरे व ईतर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. शुभम रामदास राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत वंदना भ्र. रामेश्वर मोरे (वंदना पिता मन्सूब जाधव) हे दि. २७/१२/२०२३ रोजी मौजे निंभोरा कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहे वंदना भ्र. रामेश्वर मोरे (वंदना पिता मन्सूब जाधव) हे मयत झाल्या मुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणून अर्जदार यांना अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी.ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्राची आवश्यक आहे व तशी मागणी अर्जात केली.

त्या अर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो आदेश करण्यात याईल व तसेच कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात याईल.

सबब हे जाहीर प्रगटण

दिः ०१/०१/२०२५

आदेशावरून

लिपिक सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड.

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचा न्यायालयात.**

दि.कि.अर्ज. क्र : ३७०/२०२४

पुढील तारीख : ३०/०१/२०२५

अर्जदार : उषाबाई भ्र सुनील बनकर व ईतर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. शुभम रामदास राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत सुनील पिता काशिनाथ बनकर हे दि. २३/१०/२०२४ रोजी मौजे हेडगेवार हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर जि.छ. सांभाजीनगर येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहे. सुनील पिता काशिनाथ बनकर हे मयत झाल्या मुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणून अर्जदार यांना अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी.ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्राची आवश्यक आहे व तशी मागणी अर्जात केली.

त्या अर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो आदेश करण्यात याईल व तसेच कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात याईल,

सबब हे जाहीर प्रगटण

दिः ३१/१२/२०२४

आदेशावरून

लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड.

---

### जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ४३/२०२५

अर्जदार - १. शिताबाई शेषराव थोरात रा. लखमापुर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. रावसाहेब शेषराव थोरात रा. वरील प्रमाणे ३. नानासाहेब शेषराव थोरात रा. वरील प्रमाणे ४. मुक्ताबाई अशोक मदने रा. माका, ता. व जि. अहमदनगर ५. एकनाथ शेषराव थोरात रा. लखमापुर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

विषय - कलम ३७२ वारसाकायदया १९२५ प्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र मिळणेबाबत..

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत सक्सेशन प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, अर्जदार यांनी अर्जात असे म्हणले आहे की, असे की, अर्जदार कं. १ हि मयत शेषराव यशवंतराव थोरात यांची पत्नी असुन, अर्जदार कं. २ ते ५ हि मुले व मुली आहेत. शेषराव यशवंतराव थोरात हे दिनांक २८/०३/२०२१ रोजी आजारपणामुळे अहमदनगर येथे दवाखाण्यामध्ये मयत झालेले आहेत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधारकार्ड अर्जासोबत जोडत आहे. असे की, मयत शेषराव यशवंतराव थोरात यांच्या नावावर महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचा लि. चा ट्रक्टर ज्याचा नोंदणी कं. MH- 20-FP-9749 असा असुन चेसिज की MBNWHBEMELNF04065 व इंजिन कं. NLF2WDE0009 असा आहे. शेषराव यशवंतराव थोरात हे मयत झाल्यानंतर सदरील ट्रक्टर हे वारसा हक्काने अर्जदार यांनी त्यांच्या नावावर करणेकामी आर. टी. ओ. कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना विंनती केली असता, संबंधित कार्यालयातील अधिकारी यांनी अर्जदार यांना मा. न्यायालयातुन सक्सेशन प्रमाणपत्र आणण्यास सांगितले, त्यामुळे अर्जदार यांना सदरील प्रकरण दाखल करावे लागत आहे. असे की, मयत शेषराव यशवंतराव थोरात यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत शेषराव यशवंतराव थोरात यांचे वारसदार असल्याबाबतचे सक्सेशन प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना सक्सेशन प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप असेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासनु ३० दिवसांच्या आत त्यांचा आक्षेप व उजर मा. न्यायालयात नोंदवावा, वरील मुदतीत कोणाचाही उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना सक्सेशन प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नतंर आलेला उजर व आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. पुढील तारीख १८/०२/२०२५

आज दिनांक १४/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

आदेशावरून

लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय कनिष्ट स्तर गंगापूर

## चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन केंद्रीय सचिव संजय जाजू यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार संपन्न

### ‘कालियामर्दन’ मुकपटाच्या माध्यमातून १०५ वर्षांपूर्वीच्या सिनेयुगाचा अनुभव घेण्याची संधी






छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणार्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा उद्घाटन सोहळा बुधवार, दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख संपन्न होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू हे असणार असून यावेळी राज्याच्या सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार प्रसिध्द व ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या व चित्रपट दिग्दर्शिका पद्मभूषण मा. सई परांजपे यांना त्यांच्या भारतीय सिनेमातील अतुल्य योगदानाबद्दल केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास महोत्सवाचे मानद अध्यक्ष व प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल व फ्रिप्रेसी ज्यूरी चेअरपर्सन लतिका पाडगांवकर, अभिनेत्री सीमा बिस्वास, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सोहळ्यानंतर रात्री ९ वा. पीव्हीआर-आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे यावर्षीची जागतिक पातळीवरील नावाजलेली फ्रेंच आणि तामिळ भाषेतील फिल्म लिटील जाफना फेस्टिव्हलची ओपनिंग फिल्म म्हणून प्रदर्शित केली जाणार आहे.

या उद्घाटन होत्सवाच्या दशकपुर्ती वर्षाच्या निमित्ताने आयोजन समितीच्या वतीने मराठवाड्यातील रसिकांना एका विशेष कार्यक्रमाची भेट दिली जाणार आहे. भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिध्द मुकपट कालिया मर्दन याचे विशेष प्रदर्शन उद्घाटन सोहळ्याआधी संपन्न होणार आहे. शंभर वर्षांपूर्वीचे मुकपट सिनेगृहात प्रत्यक्ष संगीताद्वारे (लाईव्ह ऑर्केस्ट्रा) दाखविले जात. तोच अनुभव रसिकांना मिळावा म्हणून कालिया मर्दन हा मुकपट कोलकाता येथील सतब्दीर सब्द या वाद्यवृंद समूहातर्फे सादरीकरणाद्वारे दाखविला जाणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या रूक्मीणी सभागृहात बुधवारी, दि. १५ जानेवारी २०२५ रोजी सायं. ५ वा. या मुकपटाचे प्रदर्शन करण्यात येईल. कालिया मर्दन विशेष प्रदर्शन व उद्घाटन सोहळ्यासाठी सर्वांसाठी प्रवेश खुला आहे.

## बिडकीन येथील विठ्ठल रुक्माई मंदिर मध्ये दर्शन व ओवासणे व हळदी कुंकूवासाठी गर्दी



बिडकीन दि १४ नवीन वर्षाच्या प्रारंभला येणारा पहिला सण म्हणजे महिलांचा मकरा संक्रातीचा सण, या सणाचे औचित्य साधून बिडकीन येथील मारवाडी गल्लीमधील विठ्ठल रुक्माई मंदिर मध्ये महिला ओवसण्यासाठी व दर्शनासाठी महिलांची मोठी गर्दी होती, मकरसंक्रांतीच्या सणामुळे बिडकीन शहरातील मंदिरामध्ये सुवासिनी दर्शन व ओवासणे व हळदी कुंकूवासाठी गर्दी केली होती मकरसंक्रांती निमित्ताने महिलांनी एकमेकांना चुडासह अन्य विविध वस्तू व तिळगुळ देतं पारंपारिक पद्धतीने मकरसंक्रांतीचा सण मोठ्या आनंदात साजरा केला.

## टीम इंडिया महिला संघाची दणदणीत विजयी सलामी

### पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा : दक्षिण कोरियाचा १५७ गुणांनी धुव्वा, नसरीन शेख सामन्याची मानकरी

नवी दिल्ली, १४ जानेवारी- टीम इंडियाच्या महिला संघाने पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेची दणदणीत विजयी सलामी दिली. नसरीन शेख या सामन्याची मानकरी ठरली.

नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत सलामीच्या दिवशी पुरुष संघाला नेपाळविरुद्ध निसटता विजय मिळाल्यानंतर महिला संघाने सलामीच्या सामन्यात गुणाचे पावणे दोन शतक पार करीत दक्षिण कोरियाचा १७५ विरुद्ध १८ असा १५७ गुणांनी अक्षरशा धुव्वा उडवित मकर संक्रांत साजरी केली.

पहिल्या डावातील पहिल्या सत्रात १०-२, दुसऱ्या सत्रात ९४-१० तर दुसऱ्या डावातील तिसऱ्या सत्रात ९७-१८ आणि अंतिम सत्रात १७५-१८ असे गुण मिळवीत टीम इंडियाने दक्षिण कोरियाची पळता भुई केली. महिलांच्या या सामन्याला प्रेक्षकाचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. प्रत्येक गुणानंतर प्रेक्षकांनी ढोल-ताशाच्या गजरात नाचत टीम इंडियाचे स्वागत केले.

## ‘लखपती दिदी’च्या माध्यमातून मिळेल महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास बळ-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (जिमाका)-केंद्र शासनाच्या ‘लखपती दिदी’ या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन महिलांचे आर्थिक सक्षमीकरणास बळ मिळणार आहे. तरी या योजनेच्या अंमलबजावणीस गती द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिले. लखपती दिदी सुकाणू समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक शिरसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक चंदनसिंग राठोड, जिल्हा शिक्षणाधिकारी(योजना) अरुणा भूमकर, जिल्हा महिला बालविकास अधिकारी रेश्मा चिमंद्रे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची अंमलबजावणी ग्रामीण पातळीवर करावी. यात महिला सुरक्षा, मुलींचा जन्मदर वाढवणे, त्याचप्रमाणे महिलांसाठी सुरक्षित वातावरण आणि महिलांच्या आर्थिक विकासासाठी त्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि व्यवसाय वृद्धीसाठी समन्वय आवश्यक आहे.यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन जिल्हा महिला बालविकास विभागामार्फत करण्यात यावे. ‘लखपती दिदी’ या योजनेअंतर्गत दिलेले उद्दिष्ट मार्चअखेर पूर्ण करावे. आजीविका या पोर्टल वरील सर्व नोंदी अद्यावत कराव्या. लखपदी दिदी योजनेत ग्रामीण भागातील जास्तीत जास्त महिलांनी सक्रिय सहभाग घ्यावा. महिलांना भांडवल आणि बँकांचे सहकार्य, सूक्ष्म गुंतवणूक, उत्पादक गटांची स्थापना, आणि सेंद्रिय शेती गटाची स्थापना यास प्राधान्य देऊन विविध शासनाच्या योजनांची अंमलबजावणी एकत्रित करून महिलांचे आर्थिक उत्पन्न जास्तीत जास्त वाढावे यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# जनआक्रोश मोर्चाची जय्यत तयारी

### सकल मराठा समाजाबरोबरच विविध जाती, धर्माच्या पक्ष संघटनांचाही मोठा सहभाग राहणार



छत्रपती संभाजीनगर : मस्साजोग आणि परभणी घटनेच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने येत्या रविवारी (दि. १९ जानेवारी) छत्रपती संभाजीनगरात सर्व पक्ष आणि सर्व जाती-धर्मांच्या बांधवाना सोबत घेऊन ‘जन आक्र ेश मोर्चा’ काढण्याचा निर्णय घेतला आहे. या मोर्चाच्या तयारीसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत विविध जाती, धर्माच्या व पक्ष संघटनांच्या नेते, पदाधिकार्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्वांनी मिळून या शहरात अभूतपूर्व असा मूक मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला.

रविवारी चिकलठाण्यातील शिवनेरी लॉन्स येथे ही तयारीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत मोर्चाचा मार्ग, तयारी याची आखणी करण्यात आली. आरक्षणासाठी मराठा समाजाच्या वतीने आतापर्यंत जसे एतिहासिक मूक मोर्चे काढण्यात आले, त्याच धर्तीवर हा मोर्चा काढण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

हा मोर्चा कोणत्याही समाजाविरूद्ध किंवा एखाद्या समुदायाविरूद्ध नसून प्रवृत्तीविरूद्ध आहे, याचा सर्वच स्तरातून निषेध होणे गरजेचे आहे. या दोन्ही घटनेतील आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे आणि अशा प्रवृत्तींना आळा बसावा, यासाठी सर्वांनी एक होणे गरजेचे आहे, असा सूर या बैठकीत निघाला. या मोर्चात सकल मराठा समाजाबरोबरच सर्व आंबेडकरी संघटना, मुस्मिम संघटना, विविध आठरा पगड जाती धर्माच्या संघटना मोठ्या ताकतीने सहभागी होतील, असे नियोजन करण्यात आले.

या बैठकीला मराठा क्रंती मोर्चा व सकल मराठा समाजाच्या सर्वच नेते, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचबरोबर आंबेडकरी चळवळीतील मुकुंद सोनवणे, प्राचार्य सुनील वाकेकर,पंडित बोर्डे, कृष्णा बनकर, गौतम खरात, गौतम लांडगे, अरूण बोर्डे, मिलींद दाभाडे, विजय वाहूळ, विशाल इंगळे, राहूल सावंत, राखी सुरडकर, विजय निकाळजे, शेख युसूफ, शेख तबरेज, खालेद पठाण, राजेश मुंडे, एल. डी. तातू, राजकुमार गाजरे यांच्यासह विविध जाती, धर्माचे अनेक वरिष्ठ नेते, चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

गावागावात, वॉर्डांमध्ये बैठक

या मोर्चाच्या जनजागृतीसाठी आणि तयारीसाठी जिल्ह्यातील सर्वच गावागावात बैठका घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात समाज बांधव मोर्चासाठी येणार आहेत. त्याबरोबर शहरातही प्रत्येक वॉर्डात बैठका घेण्यात येत आहेत. त्यामुळे मोर्चाला मोठ्या संख्येने विविध जाती, धर्माचे बांधव येण्याची शक्यता आहे.

## सोयगाव तालुक्यातील निंबायतीच्या मोती माता यात्रेत मिठाई तोलणाऱ्या वजन काट्याचीच चर्चा...६० वर्षांपासून नवसाला मिठाई तोलण्याचे काम



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१४ जानेवारी

सोयगाव तालुक्यातील निंबायती येथील नवसाला पावणारी देवी मोती माता यात्रोत्सवात सोमवारी (दि.१३) पहिल्या दिवशी तब्बल १५९ जणांनी गोड धोड मिठाईचे वजन करून नवस फेडले आहे दरम्यान गेल्या साठ वर्षांपासून नवसाला मिठाई तोलण्याचे काम करणाऱ्या त्या वजन काट्याचीच चर्चा यात्रेत होती पौष पौर्णिमेला निंबायती गावात मोती माता यात्रोत्सव सुरू होतो या यात्रोत्सवात नवस कबुल केलेल्या व्यक्तीच्या वजना इतकी मिठाई तोलुन प्रसाद म्हणून वाटप करण्याची प्रथा आहे. दरम्यान सोमवारी या यात्रेत १५९ जणांनी नवसफेडले असल्याचे वजन काटा तोलनारे गिरीधर पवार यांनी सांगितले आहे.दरम्यान पहिल्या दिवशी निंबायती यात्रोत्सवात भाविकांनी मोठी गर्दी केली होती. तर सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली रवींद्र तायडे,गजानन दांडगे,अजय कोळी,यांनी चौक बंदोबस्त ठेवला होता.पहिल्या दिवशी गोडधोड मिठाईने यात्रोत्सवची सुरुवात करण्यात येते यात्रेत मिठाईचे दुकाने लावण्यात येतात दरम्यान मोती मातेच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली होती. सरपंच सुनिता पाटील,उपसरपंच अर्चना राठोड,गावचे नाईक गजानन राठोड,राजू पाटील,धनसिंग राठोड, राजेंद्र राठोड,विशाल गोसावी,राहुल गोसावी आदींसह यात्रा कमिटीने पुढाकार घेतला होता.

## आदर्श सुवर्ण नात्यांचे व्यासपीठची बैठक संपन्न




छत्रपती संभाजीनगर : येथील आदर्श सुवर्ण नात्यांचे व्यासपीठ चे नवीन कार्यकारणी निवड संदर्भात २९ डिसेंबर २०२४ रविवार रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये आदर्श सुवर्ण नात्यांचेव्यासपीठ छ.संभाजीनगर नवीन कार्यकारणी पद निवड २५ / २६ दोन वर्ष कार्य निवड प्रक्रिया करणे, सदस्य कुटुंब नोंद करणे,जास्तीतजास्त संख्येत उपस्थितीत राहणे. येणारा खर्च हा सर्वानुमते प्रत्येक कुटुंबाकडून जमा करणे, घेणे,आदी निवड प्रक्रियेत सर्व आधिकार निर्वाचन आधिकार्याला देणे,निवड प्रक्रियेत २०२५ सर्व मान्यवर सदस्य कुटुंब रितसर नियमानुसार नोंद करुन सहभाग विषयावर सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले. या वेळी निवड प्रक्रिया २०२५ निर्वाचन आधिकारी म्हणून सर्वानुमते उमेश उध्दवराव क्षीरसागर यांची निवड करण्यात आल्याचे कळवण्यात आले. या वेळी आदर्श सुवर्ण नात्यांचे व्यासपीठ चे सर्व पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

## ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये मकरसंक्रांत सण साजरा



तभा वृत्तसेवा बिडकीन दि १४ जानेवारी

पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये मकरसंक्रांत सण उत्सहात साजरा करण्यात आला. या दिवशी तिळगुळ घ्या, गोड गोड बोला. असे म्हणत शुभेच्छा दिल्या जातात. संक्रांतीचा सण लहानांपासुन मोठ्यांपर्यंत सर्वजण आनंदाने साजरा करतात. या दिवशी पतंग उडवण्याची उत्सुकता विशेष पहायला मिळते.याच निमीत्ताने आज शाळेमध्ये मकरसंक्रांत सण साजरा करण्यात आला. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर यांनी या सनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावुन सांगितले आणि सनाच्या शुभेच्छा दिल्या. शाळेतील विद्यार्थ्यांनी आज रंगबेरंगी ड्रेस घालुन सणाचा आनंद घेतला. शाळेतील शिक्षिकांनी रंगीत पतंग आणि पारंपारिक सजावटीने शाळेचा परिसर सजवला होता. विद्यार्थ्यांना शाळेमध्ये तिळगुळ वाटप करण्यात आले.या कर्यक्रमामध्ये शाळेतील शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी यांची उपस्थीती होती. शाळेतील शिक्षिका ज्योती राठोड, अवनी चव्हाण, प्रतीक्षा पोटे, मनीषा जाधव, नंदिनी चव्हाण, रेखा चव्हाण, शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी आदीक परीश्रम घेतले.

## प्रभाग तीनच्या नगरसेवकपदासाठी सचिन घुंगासे यांना वाढती पसंती



तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता असल्याने येत्या काही महिन्यात पैठण नगरपरिषदेच्या निवडणूकीचा बिगुल वाजण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

विद्यमान लोकप्रतिनिधी यांच्या दुर्लक्षपणामुळे मागास राहिलेल्या पैठण शहरातील प्रभाग क्रमांक तीन मध्ये नगरसेवक पदासाठी सचिन घुंगासे यांना जनतेचा मोठा पाठिंबा मिळत असून नुकताच सचिन घुंगासे यांचा वाढदिवस जोरदार साजरा झाल्याने भल्या भल्यांच्या पायाखालची जमीन सरकली असल्याची चर्चा होत आहे.

येत्या काही महिन्यात पैठण नगरपरिषदेच्या निवडणूकीचा बिगुल वाजण्याची शक्यता असून प्रभाग क्रमांक तीन मध्ये नगरसेवक पदासाठी युवा नेतृत्व सचिन घुंगासे यांना प्रबळ दावेदार मानले जात आहे. शहरभरात झळकलेले शुभेच्छा फलक तसेच शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत विविध सामाजिक उपक्रमाने नुकताच सचिन घुंगासे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी आतापासूनच आपला नगरसेवक म्हणून सचिन घुंगासे हे आहे असे नागरिकांचे म्हणणे आहे.

# कन्नड तालुक्यात नामविस्तार दिन साजरा



तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१४ जानेवारी -शहरातील आंबेडकर उद्यानात समाज बांधवांनी एकत्र येऊनदि.१४ जानेवारी रोजी दुपारी १२ वा.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाम विस्तार दिन साजरा करण्यात आला यावेळी कांचन धनेधर , शैलेजा कांबळे, जनाबाई जाधव ,सुशीला साथदिवे ,कल्पना मनवर ,मंगला कांबळे, लताबाई अवचार सविता बोर्डे, शंकुतला देहाडे, दैवशाला अंभोरे, पुष्पाबाई साळवे ,पंचशीला शिरसाट, सखुबाई देवरे ,लक्ष्मीबाई वाहूळ, संगीता आलिंग , अरविंद कांबळे, रमेश धनेधर यांच्यासह मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते .

नामविस्तार दिन महाविद्यालयात साजरा

कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिंबाजी येथे दि. १४ रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मगर हे होते. प्रमुख पाहुणे मराठी विभाग प्रमुख डॉ. अनिता खंडागळे व हिंदी विभाग प्रमुख डॉ. विक्रम सिंह पवार हे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्राचार्य डॉ. संजय मगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय वाकळे यांनी केले. तर आभार डॉ. प्रतिभा आघार्डे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## संघ हीच जीवनगाथा



अलक (१३) **शाखा**

डॉक्टरांनी अद्भुत शाखा पद्धतीचा अविष्कार केला. ज्यामुळे अति उत्कट राष्ट्र चेतना जागृत करणे सहजशक्य झाले. आज शाखेत प्रतिदिन बहुमुखी कार्यक्रम होतात. परंतु प्रत्येक ठिकाणी नमस्ते सदा वत्सले मातृभूमे हीच संस्कृत मधील सामूहिक प्रार्थना होते. आपल्या महापुरुषांचे अमृत वचन, त्यांची यशोगाथा सांगणारे गीत किंवा गोष्ट सांगतात वर्तमान राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा करतात. प्रतिदिन एकात्मता स्तोत्र आणि एकात्मता मंत्र म्हणतात. त्यामुळे स्वयंसेवकांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत होते. हीच व अशीच एक तासाची दिनचर्या साप्ताहिक व मासिक शाखेत तसेच गावोगावच्या शिबिरात पण करतात. सारेच सहभागी यामुळे संपूर्ण राष्ट्र एक कुटुंब ही संकल्पना प्रत्यक्ष अनुभव करतात. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## लिटल चॅम्प्स इंग्लिश स्कूल फर्दापूर येथे फॅशन शो संपन्न



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि १४ फर्दापूर येथे लिटल चॅम्प्स इंग्लिश स्कूल मध्ये फॅशन शो आयोजित करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी महापुरुष व राजे महाराजे आणि डॉक्टर, वकील, कलेक्टर,शिक्षक अशा विविध महापुरुषांचे पोशाख परिधान करून त्यांच्या वर छोटे भाषणं हि करण्यात आले यावेळी लिटल चॅम्प्स इंग्लिश स्कूल च्या शिक्षिका उपस्थित राहून कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थीनी पालक यांनी सुध्दा मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम संपन्न



सोयगाव,दि.१४ जानेवारी : वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमानिमित्त ग्रंथप्रदर्शन संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील ग्रंथालय विभागांमध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमा अंतर्गत स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील आधारित ग्रंथाचे ग्रंथप्रदर्शन भरविले होते.या कार्यक्रमाचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल निर्मला बोराडे यांनी केले. यावेळी प्रा.पंकज गावित,डॉ.निलेश गावडे,डॉ. तडवी, डॉ.संतोष पडघन,डॉ.रामेश्वर मगर,प्रा.सय्यद सर,ग्रंथालयीन कर्मचारी भरत औरंगे,वैष्णवी काळे,विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.तर कार्यक्रमाचे आभार डॉ. पंकज शिंदे यांनी मानले

## तालुका स्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

सोयगाव,दि.१४ जानेवारी : तहसील कार्यालय सोयगाव येथे महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिन साजरा केला जातो.जिल्हा स्तरावर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात होते. त्याच प्रमाणे तहसील कार्यालय सोयगाव येथे दि.२० जानेवारी सोमवार रोजी लोकशाही दिन आयोजित केलेला आहे. तरी सर्व तालुक्यातील व गाव-पातळीवरील ग्रामस्थांनी आपल्या अडचणी, तक्रारी, लोकशाही दिनी तहसील कार्यालय सोयगाव येथे दाखल कराव्यात व आपल्या समस्या,अडचणी,तक्रारी, सोडविण्यात यांवे असे आवाहन तहसील कार्यालय सोयगाव येथील तहसीलदार मनीषा मेने-जोगदंड व अखिल भारतीय ग्राहक पंचायत सोयगाव तालुका अध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी यांनी केले आहे.

## अनधिकृत गुंतवणूक योजनांबद्दल एंजेल वन गुंतवणूकदारांना सतर्क करते

मुंबई : फिनटेक क्षेत्रातील आघाडीची कंपनी, एंजेल वन लिमिटेडने एंजल वनच्या नावाचा गैरवापर करणाऱ्या तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे वापरून तोतयागिरी करणाऱ्या फसव्या सोशल मीडिया गटांच्या वाढत्या व्याप्तीबद्दल गुंतवणूकदारांना सतर्क करते. एंजेल वनशी संबंध असल्याचा खोटा दावा करून, सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर अनेक अनधिकृत गट तयार होत असल्याचे कंपनीचे निरीक्षण आहे.आवश्यक सेबी नोंदणी/परवानगीशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित सल्ला किंवा शिफारसी प्रदान करणे, तसेच सेबी च्या मंजुरीशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित परतावा आणि कामगिरीबद्दल अनधिकृत दावे करणे, अशा बेकायदेशीर गोष्टींमध्ये हे फसवे गट गुंतले आहेत, हे एंजेल वनने ओळखले आहे.व्हॉट्सऍप आणि टेलीग्राम ग्रुप एंजल वन लिमिटेडचे ब्रँड नाव आणि लोगो तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे आणि प्रतिमा यांचा बेकायदेशीरपणे आणि भ्रामकपणे गैरवापर करत आहेत. आणि ते एंजल वन लिमिटेडशी संबंधित आहेत असा विश्वास ठेवत सर्वसामान्यांची दिशाभूल करत आहेत.

## सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) तर्फे अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा जाहीर

मुंबई : सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) (डखण), ही संस्था शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी जगभरात लोकप्रिय संस्था आहे. या संस्थेतर्फे सिम्बॉयसिस एंट्रन्स टेस्ट (डएढ) आणि एसआयटी इंजिनीअरिंग एंट्रन्स ट्रेस्ट २०२५ च्या माध्यमातून त्यांच्या अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमांसाठी अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत. दोनदा संधी या नव्याने उपलब्ध झालेल्या सुविधेमुळे उमेदवारांना दोनपैकी सर्वोत्कृष्ट गुणांच्या माध्यमातून आपली कामगिरी अधिक चांगली करता येणार आहे. या परीक्षा ५ मे २०२५ आणि ११ मे २०२५ रोजी होणार आहेत आणि निकाल २२ मे २०२५ रोजी जाहीर होतील. सिम्बॉयसिस एंट्रन्स टेस्ट) आणि सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग एंट्रन्स एक्झाम) या एक तासाच्या कम्प्युटर आधारित प्रवेश परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची विविध विभागांमधील कौशल्ये आणि कल तपासला जातो. उमेदवारांना प्रत्येक परीक्षेसाठी दोन संधी मिळतात. ही परीक्षा सर्वत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने भारतातील ८० शहरांमध्ये घेतली जाते.

## विनिलाबेन पटेल यांचे निधन



तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ :- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनसंघाच्या काळातील जुन्या कार्यकर्त्या विनीलाबेन द्वारकादास पटेल (९५) यांचे आज वृध्दापकाळाने निधन झाले. दि. १५ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्यावर अंत्संयसंस्कार केले जाणार आहे. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. जनसंघाच्या काळात त्या पैठण शहरासह ग्रामीणमध्ये पक्ष कार्यात सक्रिय होत्या.

## अग्रलेख...

# रणी फडकती लाखो झेंडे...

असंख्य खडतर आव्हाने समोर उभी असताना त्यांच्याशी सामना करून, त्यांना परतवून लावल्यानंतर मिळणाऱ्या यशाचे अनेक रंग असतात. कधी अशा यशाचा उन्माद चढतो, तर काहींना या यशाची नशा येते. यशामुळे निर्माण होणाऱ्या उन्माद आणि नशा या अवस्थांचे मानसिकतेवर बरेचदा विपरीत परिणाम होतात आणि त्यामुळे मनाचा विवेक हरवतो. ज्यांना अशा यशाचा आनंद केवळ निखळ होतो, त्यांची विवेकबुद्धी संतुलित राहते, पायही जमिनीवर असतात आणि यशासोबत समोर येणाऱ्या आव्हानांच्या जाणिवा प्रगल्भ होऊन नवी आव्हाने ही नवी जबाबदारी मानली जाते. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीनंतर भाजपप्रणीत महायुतीला, आणि विशेषतः भारतीय जनता पार्टीला मतदारांनी दिलेला सत्तास्थापनेचा निर्विवाद कौल ही अशाच एका निर्भेळ यशाची स्थिती म्हणावी लागेल. या यशापर्यंत पोहोचण्याआधी राज्यातील भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांना जी आव्हाने पेलावी लागली, ती महाराष्ट्राच्या राजकारणात याआधी क्वचितच कोणास पेलावी लागली असतील. भाजपाने या निवडणुका विशेषतः देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लढविल्या. केंद्रातील मोदी सरकारची साथ, भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाचा भक्कम पाठिंबा, निरपेक्ष कार्यकर्त्यांची प्रचार नीती आणि राष्ट्र प्रथम ही पक्षाची राजनीती यांच्या आधारावर फडणवीस यांनी हे आव्हान पेलून परतविताना दाखविलेला संयम निश्चितच कौतुकास पात्र आहे. फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नव्या सत्तेची सूत्रे हाती घेण्याआधी महाराष्ट्रात महायुतीचेच सरकार होते, पण त्या काळातही फडणवीस हेच बरेचदा विरोधकांच्या हीन टीकेचे लक्ष्य होते. एका दृष्टीने, अशा कसोटीच्या काळात कोणत्याही नेत्याच्या क्षमतेचा, मानसिकतेचा आणि नेतृत्वाचा कस लागत असतो. या कसोटीत पुरेपूर उत्तीर्ण झाल्यानंतर मिळणाऱ्या यशाचा आनंद निर्भेळ असतो. फडणवीस यांनी या आव्हानांना कमालीच्या संयमाने तोंड दिले आणि आव्हानांच्या साऱ्या कसोट्या पार केल्या, त्यामुळे विधानसभा निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या निर्भेळ यशाचा आनंद मोठा मानावा लागतो. अशा यशानंतरच्या अवस्थेत उन्मादाला जागा नसतेच आणि त्याची नशादेखील डोक्यात भिनत नाही.

रविवारी महाराष्ट्राच्या साईनगरी शिर्डीमध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातील महत्त्वाच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पक्षाने साजऱ्या केलेल्या महाविजय सोहळ्यात हेच चित्र दिसले. तो केवळ विजयोत्सव नव्हता. या सोहळ्यात उन्मादाचा अंशदेखील नव्हता आणि विजयाची नशा तर तेथे उमटलीदेखील नव्हती. जे यश जबाबदारीच्या जाणिवादेखील जाग्या करते, त्या यशाची झळाळी काही वेगळीच असते. शिर्डी येथील महाविजय मेळावा या झळाळीनेच झळकला. केवळ यशाचा डिंडिम न वाजविता, नव्या जबाबदारीची जाणीव रुजविण्याचे काम या मेळाव्यात पक्षाच्या प्रत्येक नेत्याने केले आणि ज्यांच्या शिरावर या जबाबदाऱ्या आहेत, त्या नेत्यापासून कार्यकर्त्यापर्यंत प्रत्येकाने त्याचा विनम्रपणे स्वीकारही केला.

राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये विजयानंतरच्या मानसिकतेत असे दृश्य अभावानेच दिसते. अनेक राजकीय पक्ष विजयाच्या केवळ संकेतांनीदेखील हुरळून जातात. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राने आणि देशानेही याचा अनुभव घेतला. लोकसभेच्या निवडणुकीत इंडिया आघाडीला बहुमत मिळण्याची चिन्हेदेखील दिसत नव्हती, त्यामुळे सत्तेच्या संकेतांचे साधे वारेदेखील शिवले नव्हते. पण केवळ विजयी उमेदवारांचा आकडा वाढल्याचा अपार उन्माद त्या निकालानंतर या आघाडीच्या अनेक नेत्यांना लपविता आला नव्हता. पराभवाचाही जल्लोष केला जातो, हे त्या काळात अनुभवणाऱ्या जनतेने रविवारी शिर्डी येथील भाजपाच्या महाविजय मेळाव्यात साजऱ्या झालेल्या संयत विजयोत्सवाचा अनुभव घेताना याची तुलना नक्कीच केली असेल. लोकसभेच्या निवडणुकीत लागलेल्या निकालाने महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या आणि देशातील इंडिया आघाडीच्या शिडात एवढे वारे शिरले, की त्याच्या प्रभावामुळेच कदाचित या आघाडीचे तारू पुढे कमालीचे भरकटले. इंडिया आघाडीने एकत्र निवडणुका लढविल्यामुळे किंचित दिलासा देणाऱ्या पराजयातून उमटलेल्या विजयाच्या अंधुक आशा आता मावळल्या आहेत आणि आता किनारा गाठण्यासाठी आपल्यालाच हातपाय मारावे लागतील याच्या जाणिवा झाल्यानंतर या आघाडीतील काही पक्ष स्वबळाचे नारेदेखील देऊ लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत उमललेल्या आशा हे केवळ मृगजळ होते, लक्षातच न घेतल्यामुळे, त्या यशाच्या जाणिवांनी हुरळून गेल्याचा फटका विधानसभा निवडणुकीत बसला, याची कबुली देणाऱ्या महाविकास आघाडीतील जाणत्या नेत्यांना भाजपाच्या या विजयोत्सवाने संयमी राजकारणाचे नवे धडे नक्कीच दिले असतील. असा विजयोत्सव साजरा करण्याची संधी भविष्यात कधी मिळेलच, यावर आता महाविकास आघाडीच्या नेत्यांचा किंवा त्यातील घटक पक्षांचा विश्वासही राहिलेला नसेल, एवढी गलितगात्र अवस्था ओढवली असताना, विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता थांबायचे नाही, प्रत्येक विजय आपलाच असला पाहिजे, असा निर्धार करून नव्या जबाबदारीची तयारी सुरू करणे हे भाजपाच्या विजयोत्सवाचे वेगळेपण ठरते.

खरे पाहता, विजयोत्सव साजरा करण्याकरिता असा मेळावा आयोजित करून भाजपाने आपल्या भविष्यातील वाटचालीची नीती स्पष्ट केली आहे. हा मेळावा विजयोत्सवाचा होता असे म्हटले जात असले, तरी यामध्ये मार्गदर्शन करणाऱ्या प्रत्येक नेत्याने कार्यकर्त्यांस आणि नेत्यांसही, नव्या जबाबदारीच्या जाणिवांचे भान देण्याचे काम केले. म्हणजे, सन २०२४ मध्ये सुरू झालेली विजयोत्सवाची परंपरा २०२५ च्या वर्षातील प्रत्येक निवडणुकीत अधिकाधिक उंचावली पाहिजे, हे ध्येय कार्यकर्त्यांचा गळी उतरवून भाजपाने महाराष्ट्राच्या आगामी राजकारणाच्या वाटचालीतील पहिले दमदार पाऊल शिर्डी येथे टाकले. पक्षाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिलेला 'पंचायत ते पार्लमेंट' हा कानमंत्र घेऊन कार्यकर्ते परतले आहेत. आता महाराष्ट्र थांबणार नाही, असा नारा विजयप्राप्तीनंतर देणाऱ्या फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आता पक्षाचा कार्यकर्तादेखील विजयाचे झेंडे उंचावल्याखेरीज थांबणार नाही असा विश्वास या महामेळाव्याने दिला. महाविकास आघाडी किंवा इंडिया आघाडीच्या नेत्यांचा आत्मविश्वास महाराष्ट्रात भाजपाला मिळालेल्या महाविजयामुळेच डळमळीत झाल्याचा दावा अमित शाह यांनी या मेळाव्यात केला. कदाचित यामुळेच शिडात फुटीचे वारे शिरलेले महाविकास आघाडीचे तारू दिशाहीन अवस्थेत भरकटत जात असावे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवाच्या फटक्याने त्याच वर्षातील लोकसभा निवडणुकांच्या विजयाच्या उन्मादाची नशा पुरती उतरवून टाकल्याने, २०२५ च्या आव्हानांचा सामना करण्याचे आव्हान आता महाविकास आघाडीसमोर आहे आणि आपली क्षमता, संयमी नेतृत्वाचे गुण व रणनीतीच्या डावपेचांतील सारे वर्चस्व सिद्ध केलेल्या देवेंद्र फडणवीस नावाच्या कसलेल्या सेनापतीशी आपला मुकाबला आहे, याची जाणीवही या आघाडीच्या नेत्यांच्या बदललेल्या सुरातून उमटू लागली आहे. रविवारी विजय मेळाव्यात अमित शाह यांनी शरद पवार यांच्या कथित जाणतेपणाचा बुरखाच उतरवून टाकला. निवडणुकीआधी विजयाची गणिते मांडून माध्यमांच्या शिकवण्या घेणाऱ्या पवार यांना वास्तवाचे भान देऊन जमिनीवर आणण्याचे काम करून अमित शाह यांनी राज्यातील भाजपा कार्यकर्त्यांच्या आत्मविश्वासात भर घातलीच, पण कार्यकर्त्यांच्या बळावरच असा विजय मिळू शकतो हा विश्वासही रुजविला. देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व, मोदी, शाह आणि केंद्रातील पक्षनेत्यांचा भक्कम पाठिंबा आणि आत्मविश्वास हरविल्यामुळे भरकटलेले गलितगात्र विरोधक ही नव्या रणनीतीची शिदोरी घेऊन भाजपा आता महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरिता सिद्ध होऊन मैदानात उतरली आहे. पाणीदार आणि ऊर्जावान महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी पारदर्शी व प्रामाणिक वाटचालीचा संकल्प सोडून निघालेल्या या विजययात्रेमुळे महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या राजनीतीला परिवर्तनाची नवी दिशा प्राप्त होईल यात शंका नाही.

## आंतरराष्ट्रीय

### वसंत गणेश काणे

# कुवैत दौऱ्याचे वेगळेपण

या वेळचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कुवैत दौरा वेगळा होता. ४३ वर्षांनंतर कुवैत दौऱ्यावर जाणारे पंतप्रधान मोदी पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. त्यांच्याआधी फक्त इंदिरा गांधी यांनी १९८१ साली कुवैतचा दौरा केला होता. आखाती देशांमधील कुवैत हा भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या कुवैत दौऱ्यात 'विसम मुबारक अल-कबीर' किंवा 'ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट' या कुवैतच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. कुवैतचे एमीर शेख मीशाल अल-अहमद अल-जाबीर अल-साबह यांनी पंतप्रधान मोदींना या पुरस्काराने सन्मानित केले. विविध देशांच्या राष्ट्र प्रमुखांना कुवैत सरकार या पुरस्काराने सन्मानित करते. मैत्री संबंध मजबूत करणे आणि सदिच्छा, सद्भावना व्यक्त करणे हा पुरस्कार देण्यामागे हेतू असतो. मुबारक अल-सबा यांच्या स्मरणार्थ १९७४ सालापासून कुवैत सरकारकडून हा पुरस्कार देण्यास सुरुवात झाली. मुबारक अल-सबा हे मुबारक अल कबीर आणि मुबारक द ग्रेट म्हणून ओळखले जातात. १८९६ ते १९१५ पर्यंत त्यांनी कुवैतवर राज्य केले होते.

कुवैत हा मध्य-पूर्वेतील एक देश आहे. कुवैतच्या दक्षिणेला सौदी अरेबिया, पश्चिम व उत्तरेला इराक तर पूर्वेला पर्शियन आखात आहे. पर्शियन आखाताच्या उत्तर टोकाला हा देश आहे. आखात म्हणजे तीन बाजूंना जमिनीने वेढलेला आणि केवळ एकाच बाजूने पाणी असलेला जलयुक्त भाग होय. मोठा विस्तार असलेल्या आखातास उपसागरही म्हणतात. कुवैत इराणलाही लागून आहे. कुवैत हे मोठे शहर कुवैत देशाची राजधानी आहे. अमेरिका, जर्मनी आणि सौदी अरेबियात परदेशात जन्मलेल्यांची संख्या भरपूर आहे. तसाच प्रकार कुवैतबद्दलही आहे. कुवैत हा जगातील अतिश्रीमंत व अतिप्रगत देश मानला जातो. कुवैतची लोकसंख्या ५० लाखांच्या आत असून त्यात २.५ लाख हिंदू आहेत. सन १९६१ पर्यंत कुवैतमध्ये भारतीय रुपया हा अधिकृतपणे चलन म्हणून मान्यताप्राप्त होता. कुवैतची भूमी तेलसंपन्न होण्यापूर्वी अनेक शतके कुवैतशी भारताचे व्यापारी संबंध होते. कुवैतमध्ये नैसर्गिक तेल सापडले आणि कुवैत व भारत यातील संबंधांना नवीन झळाळी प्राप्त झाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तारूढ होताच परराष्ट्र धोरणाबाबत नव्याने विचार केलेला आढळतो. धोरण तेच, पण अमलात आणण्याची पद्धत वेगळी! ही बाब अनेक पटींनी लाभप्रद ठरते. पश्चिम आशियातील देश याचे उत्तम आहे. मोदी यांनी आखाती देशांच्या संबंधांवर विशेष भर दिला आहे. यात केवळ आर्थिक मुद्दे नाहीत. त्यांनी सांस्कृतिक, धार्मिक पातळीवरही संबंध प्रस्थापित केले आहेत. भारताचे जगभर स्नेहाचे संबंध प्रस्थापित करण्यावर त्यांचा भर असतो. मोदी १४ वेळा आखाती देशात जाऊन आले आहेत, ते काय उगीचच? कुवैतमध्ये आज लाखो भारतीय काम करतात. हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती असे सगळेच आहेत. कुवैतमधील ३० टक्के कर्मचारी भारतीय आहेत. यावरून कुवैतच्या अर्थकारणातील भारताचे स्थान किती मोलाचे आहे, हे लक्षात येते. कुवैत किंवा अन्य आखाती देश खनिज तेलावरील अवलंबित्व कमी करण्याच्या खटाटोपात आहेत. कारण आज ना उद्या पेट्रोलचे महत्त्व कमी होणार, हे नक्की आहे आणि हे ते जाणून आहेत. औषधी उद्योग आणि माहिती तंत्रज्ञान याबाबत हे देश भारतावर अवलंबून आहेत. आरोग्य व शिक्षण याबाबतही भारत या देशांच्या उपयोगी पडू शकतो. या सर्व क्षेत्रांत चीन भारताचा प्रतिस्पर्धी आहे खरा; पण चीनपेक्षा भारत या देशांना अधिक विश्वसनीय वाटतो, ही वस्तुस्थिती आहे. कुवैतमधील भारतीय नागरिक पैसा कमावून तो भारतात पाठवतात. कुवैत आपल्याला इंधन-तेल पुरवतो. तिथले अनेक उद्योग भारतीयांच्या भरवशावर सुरू आहेत. आखाती देश म्हणजे इस्रायलविरोधी देशांची आघाडी होती, असे एकेकाळी मानले जायचे आणि ते खरेही होते. यात बदल होणे ही काळाची गरज होती. मोदींनी हे जाणून भारताचे धोरण आखले आहे. तुर्कस्थानचे स्वतःचे जरी इस्रायलबरोबर संबंध आहेत, तरी दुसऱ्या कुणी इस्रायलशी संबंध ठेवलेले त्याला खपत नाही. याला राजकारणात दुटप्पीपणा न म्हणता धोरणीपणा म्हटले जाते. इजिप्त (लोकसंख्या १० कोटी) आणि जॉर्डन (लोकसंख्या १ कोटी) यांनी अगोदरच इस्रायलशी राजकीय संबंध प्रस्थापित केले असल्यामुळे आता तीन अरब देशांचे इस्रायलशी राजनैतिक संबंध प्रस्थापित झालेले दिसताहेत. सर्वच मुस्लिम देशांनी इस्रायलशी कोणत्याही प्रकारे संबंध न ठेवून त्याची कोंडी व कोंडमारा करण्याचे एकेकाळी ठरविले होते. पण इजिप्त, जॉर्डन, अमिरात व तुर्कस्थान या देशांनी इस्रायलशी संबंध प्रस्थापित झाल्यामुळे कोंडी काहीशी सैल झाली आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये इतर मुस्लिम राष्ट्रांशी भारताची असलेली मैत्री पाकिस्तानला खुपते. पूर्वी आखाती देशांची संघटना फारसा विचार न करता भारतविरोधी ठराव पाकिस्तानच्या आग्रहाखातर पारित करीत असत. भारताने इकडे फारसे लक्ष न देता आपली आर्थिक आणि सामरिक शक्ती वाढविली. याच काळात पाकिस्तानची आर्थिक स्थिती पार ढासळली. केवळ आशियातलाच नाही तर संपूर्ण जगातला हा खूप मोठा बदल मानला जातो. एकेकाळी भारतात जरासेही कुठे खुट्ट झाले तरी आखाती देश निषेधाचे ठराव करीत. आता ते याला 'भारताचा अंतर्गत प्रश्न आहे' असे म्हणून समजूतदारपणा दाखवू लागले आहेत. याच कुवैतमध्ये एकेकाळी देशातील सर्व हिंदू कर्मचाऱ्यांना मायदेशी परत पाठविण्याचा प्रस्ताव आला होता, पण आज परिस्थिती बदलली आहे.

मोदींना कुवैतने अत्यंत आदराची वागणूक तर दिलीच; पण देशातला सर्वोच्च सन्मानही प्रदान केला. हा मोदींचा गौरव तर आहेच, पण हा केवळ मोदींचा गौरव नाही, तर तो भारताचा गौरव आहे. आज सगळेच आखाती देश पैसे मिळविण्यासाठी तेलाशिवाय अन्य साधनांचा स्वीकार करण्याचे बाबतीत गांभीर्याने विचार करू लागले आहेत. या कामी त्यांना भारताचा जेवढा भरवसा वाटतो, तेवढा चीनचा वाटत नाही, याचे प्रत्यंतरही आले आहे. यावेळी आखाती देशांचे भारतासोबत व्यापारी करार झाले आहेतच; शिवाय असे की, लष्करी सहकार्याचे कराराही झालेले आहेत, हे विशेष म्हटले पाहिजे. कुवैत, कतार, बहारीन, सौदी अरेबिया, ओमान, संयुक्त अरब अमिराती आणि इराक यांच्याशी भारताचे उत्तम संबंध पूर्वीपासूनच आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी डिसेंबर २०२४ मध्ये कुवैतला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी कुवैतचे नेते आणि कुवैतमध्ये राहणारे भारतीय कामगार आणि अन्य नागरिकांच्या भेटी घेतल्या व संवाद साधला. भेटीवर निघण्यापूर्वी मोदींनी भारत आणि कुवैत यातील पूर्वापार संबंधांचा आवर्जून उल्लेख केला होता. आमचे संबंध केवळ व्यापारापुरते मर्यादित नाहीत तर जागतिक शांतता, सुरक्षा, स्थैर्य आणि प्रगती हेही आमचे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या भेटीदरम्यानच्या काळात २६ व्या अरेबियन गल्फ क्लबच्या फुटबॉल सामन्यांच्या उद्घाटन कार्यक्रमाला मोदी उपस्थित होते. विषय जागतिक शांततेचा असो की खेळांच्या सामन्यांचा; मोदींची तत्परता डोळ्यात भरावी अशी असते.

९४२२८०४४३०

## वेध

### पुंडलिक आंबटकर

# सोयाबीन उत्पादक आणि सरकार

मागील तीन दशकांपासून महाराष्ट्रात आणि प्रामुख्याने विदर्भात सोयाबीन पेरा प्रचंड वाढला आहे. नगदी पीक म्हणून शेतकरी सोयाबीन लागवड करतात. परंतु, आजही जगाच्या तुलनेत भारतात फक्त ३ टक्केच सोयाबीन उत्पादन होते. यामुळे भारत सरकार सोयाबीनच्या भावावर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ आहे. भारताला दरवर्षी ३० लाख मेट्रिक टन सोयाबीन तेलाची गरज भासते. परंतु, भारतात केवळ १५ लाख मेट्रिक टन इतकेच सोयाबीन तेलाचे उत्पादन होत असल्याने उर्वरित १५ लाख मेट्रिक टन तेल सरकारला दरवर्षी आयात करावे लागते. भारताला वर्षभरात जवळपास २६० लाख मेट्रिक टन खाद्यतेलाची गरज पडते. मात्र, देशात केवळ ९० ते ९८ लाख मेट्रिक टन इतकेच उत्पादन होत असल्याने उर्वरित १६० लाख मेट्रिक टन खाद्यतेल आयात करण्याशिवाय पर्याय नाही.

यंदा भारतात १३१ लाख मेट्रिक टन सोयाबीन उत्पादन झाले. मात्र, या सोयाबीनमधून केवळ १८ टक्केच तेल प्राप्त होत असल्याने देशवासीयांची गरज पूर्ण होऊ शकत नाही. सोयाबीनचे दर सोया पेंडच्या मागणीवर अवलंबून असतात. मात्र, मागीलवर्षी मका पेंड स्वस्त दरात उपलब्ध झाल्याने सोयाबीन पेंडचा उठाव होऊ शकलेला नाही. अशा परिस्थितीत सोयाबीन पेंडच्या निर्यातीला प्रोत्साहन देऊनही दर वाढण्याची शक्यता नसल्याने भाजपा किसान मोर्चाने अनुदानाची मागणी युती सरकारकडे केली होती. त्यामुळे तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी ओलाव्याची मर्यादा ३ टक्के वाढवून भावांतर योजनेची घोषणा केली होती. ज्या शेतकऱ्यांचा माल हमीभावापेक्षा कमी किमतीत विकला गेला त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. केंद्र सरकारने ४ हजार ८९२ रुपये हमीभाव सोयाबीनला जाहीर केला. मात्र, खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांना आपला माल ४ हजार २०० रुपये किंवा त्यापेक्षा कमी किमतीत विकावा लागला. भविष्यात सोयाबीन उत्पादकांना दिलासा मिळावा म्हणून महायुतीने सोयाबीन प्रक्रिया उद्योग वाढविण्याची घोषणा निवडणूक जाहीरनाम्यात केली होती. आता महायुती सरकार प्रचंड मताधिक्यासह विराजमान झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा बळावल्या आहेत. सोयाबीन उत्पादनातून १८ टक्के तेल काढून उर्वरित चोथा प्रक्रिया उद्योग अथवा पशुआहारासाठी पुरविला जातो. त्यामुळे सोयाबीनचे दर सोया पेंडच्या उठावावर अवलंबून असतात. मात्र, मागील वर्षीपासून सोया पेंडचा उठाव पाहिजे त्या प्रमाणात न झाल्याने सरकारने ठरवूनही सोयाबीनचे दर वाढू शकलेले नाही.

जगात सर्वाधिक सोयाबीन उत्पादन ब्राझील, अमेरिका, अर्जेंटिना आणि चीनमध्ये होते. त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. भारतात सोयाबीन लागवडीचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. तरीही उत्पादन पाहिजे त्या प्रमाणात वाढू शकलेले नाही. सोयाबीन हे एक तेलबिया उत्पादन असल्याने जमिनीतील पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात ते शोषून घेतात. मात्र, जनावरांची संख्या प्रचंड प्रमाणात घटल्याने शेतीसाठी शेणखत उपलब्धच होत नाही. परिणामी, दिवसेंदिवस जमिनीचा पोत घसरत आहे. त्यामुळे लागवड क्षेत्र वाढूनही उत्पादनात वाढ होऊ शकलेली नाही. शिवाय रासायनिक खतांचा भडिमार होत असल्याने बहुतांश शेतीतील उत्पादन ६० टक्क्यांनी घटले आहे. त्यामुळेच सरकार सेंद्रिय शेतीबाबत आग्रही आहे. सुरुवातीच्या काळात एकरी सरासरी १० ते १२ क्विंटल पिवळ्या सोयाबीनचे उत्पादन व्हायचे. आता केवळ ३ ते ४ क्विंटल इतकेच उत्पादन होते. त्या तुलनेत लागवड खर्च प्रचंड वाढल्याने सोयाबीन उत्पादकांना नापिकीतून बाहेर काढणे कठीण होऊन बसले आहे.

जगात एकरी सर्वाधिक सोयाबीन उत्पादनाचा विक्रम जॉर्जियातील शेतकऱ्याच्या नावावर आहे. २०१९ मध्ये तेथील एका शेतकऱ्याने तब्बल ५१.७७ क्विंटल एकरी उत्पादन घेतले! भारतात सर्वाधिक उत्पादन मध्यप्रदेशात होते. त्यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. महाराष्ट्राचे एकरी सरासरी उत्पादन अवघे ४.७९ क्विंटल इतके आहे. हे उत्पादन वाढविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. परंतु, जमिनीला पोषण मिळणे गरजेचे असल्याने भविष्यात शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे. विदर्भातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने या भागातच सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या आणि यास प्रामुख्याने सोयाबीन शेती कारणीभूत ठरली. अशा परिस्थितीत उत्पादकता वाढविण्यासाठी सरकारकडून अनेक योजना कार्यान्वित करण्यात येत आहे. मात्र, प्रशासकीय व्यवस्थेने या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. अन्यथा कितीही योजना आखल्या तरी मूळ उद्देश साध्य न झाल्यास शेतकऱ्यांना नापिकीच्या खाईतून बाहेर काढणे शक्य होऊ शकत नाही.

९८८१७१६०२७

## इतस्ततः

### दत्तात्रेय आंबुलकर

# रोजगारासाठी भारतीय कौशल्य विकास संस्था

सद्य:स्थितीत विद्यार्थी-युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या जोडीलाच कौशल्यविषयक शिक्षण-प्रशिक्षण देणे त्यांना अधिकाधिक रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने तितकेच आवश्यक आहे. बदलता काळ आणि वाढत्या कौशल्यविषयक गरजा लक्षात घेऊनच खाजगी-सार्वजनिक सहभागातून उद्योगांना कौशल्यप्राप्त उमेदवार वेळेत प्राप्त व्हावेत, या मोठ्या व व्यावहारिक उद्देशांसह मुंबई येथे 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स'ची स्थापना करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्थापन करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विद्यापीठात उद्योग-व्यवसायांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढत्या कौशल्यविषयक गरजांची पूर्तता करण्यासाठी स्थापनेनंतरच्या पहिल्या टप्प्यात खालील विशेष कौशल्य अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

१) ॲडव्हान्सड इंडस्ट्रियल ऑटोमेशन ॲण्ड रोबोटिक २) इंडस्ट्रियल ऑटोमेशन फंडामेंटल ३) ॲडव्हान्सड आर्क वेल्डिंग टेक्निक ४) ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग ५) इलेक्ट्रिक वाहन बॅटरी विशेषज्ञ ६) दुचाकी व तीनचाकी इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञ.

वरील कौशल्य विकास अभ्यासक्रमांचा मुख्य उद्देश संबंधित क्षेत्रातील मूलभूत शैक्षणिक पात्रताधारक विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविणे हा आहे. कौशल्य विकास उपक्रमांचा अधिकाधिक व जागतिक स्तरावर परिणामकारक उपयोग व्हावा, या विशेष उद्देशाने देश-विदेशांतील मोठ्या व निवडक अशा मोठ्या व अवघड तांत्रिक व अवजड उद्योगांसाठी सर्वत्र आवश्यक असणाऱ्या प्रगत कौशल्यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. परिणामी, कौशल्य विकास संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अद्ययावत कौशल्यप्राप्ती तर होईलच; त्याशिवाय नव्या व मोठ्या स्वरूपातील उद्योगांना कुशल कर्मचारी मिळण्याची दुहेरी सोय यानिमित्ताने कायमस्वरूपी झाली आहे.

'भारतीय कौशल्य विकास संस्थे'च्या प्राधान्यक्रमात प्रस्तावित 'इंडस्ट्री ४'च्या वाढत्या कौशल्यविषयक गरजांची पूर्तता करण्याचा धोरणात्मक व मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या उद्देशाच्या पहिल्या टप्प्यात दरवर्षी सुमारे पाच हजार युवकांना कौशल्याचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये मुख्य भर नव्या उद्योगांच्या कौशल्य गरजांची पूर्तता करण्यावर दिला जाईल. नव्या औद्योगिक गरजांनुरूप विकसित तंत्रज्ञानरूप आवश्यक कौशल्यांची पूर्तता याद्वारे होणार आहे. या संदर्भातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, 'इंडस्ट्री ४'मध्ये जागतिक स्तरावर आर्थिक, औद्योगिक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने उद्योगांतर्गत प्रगत तंत्रज्ञानासह आधुनिक उत्पादन पद्धती निर्धारित कार्यपद्धतींची अंमलबजावणी, संगणकीय पद्धती, रोबोटिक्सवर आधारित कार्यकुशलता, उत्पादन दर्जात विशेष सुधारणा, उत्पादकता वाढ व त्याद्वारे वाढता व्यावसायिक फायदा व मुख्य म्हणजे, मानवी श्रमाला तंत्रज्ञानाची प्रगत जोड देणे हा आहे. या उद्देशपूर्तीमध्ये 'कौशल्य विकास संस्थे'चे अर्थातच मोठे योगदान राहील.

याशिवाय नव्या संदर्भातील 'इंडस्ट्री ४'मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची नवी व वाढती गरज लाभणार आहे. जागतिक स्पर्धेवर यशस्वीपणे मात करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हा महत्त्वाचा आणि तितकाच निर्णायक मुद्दा ठरणार आहे. त्यासाठी कौशल्य विकासाचा मुद्दा पूर्वतयारी स्वरूपात महत्त्वाचा ठरणार आहे. कौशल्य विकासाचे महत्त्व यावरून पण स्पष्ट होते. प्रत्यक्षात, आज जागतिक औद्योगिक क्षेत्रातच विशेषतः प्रमुख औद्योगिक क्षेत्रात कौशल्यपूर्ण कामगार-कर्मचाऱ्यांची तशी वानवाच आहे. त्याचे परिणाम आर्थिक-व्यावसायिक संदर्भात प्रकर्षाने दिसून येतात. औद्योगिक विकासाला तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही, ही बाब आता सर्वांनाच पुरतेपणी लक्षात आली आहे. बदलत्या व प्रगत तंत्रज्ञान व उत्पादन प्रक्रियांसाठी आवश्यक कौशल्य प्रचलित शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होताना दिसत नाही. म्हणूनच शैक्षणिक अभ्यासक्रम व उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांमधील तफावतीची बहुतेक प्रगत उद्योगांमध्ये प्रयत्नपूर्वक मोजमाप आज जागतिक स्तरावरसुद्धा केले जात आहे. भारताच्या संदर्भात प्रामुख्याने सांगायचे म्हणजे, सद्य:स्थितीत भारतीय उद्योगांमध्ये संशोधनासह आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असलेले उद्योग, आधुनिक वैद्यक सेवा, डिझाईनसह इंजिनीअरिंग, वित्तीय सेवा, संगणकीय कार्यपद्धती, बांधकाम व विशेष मूलभूत सुविधा इ. क्षेत्रांत कौशल्याची विशेष चणचण भासते. याचे होणारे दुहेरी परिणाम म्हणजे, एकीकडे या प्रमुख व उल्लेखनीय व्यवसाय-उद्योग क्षेत्रात कौशल्यपूर्ण कर्मचाऱ्यांची कमतरता भासते तर त्याचवेळी संबंधित क्षेत्रातील औपचारिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या हुशार उमेदवारांना केवळ अपेक्षित कौशल्याअभावी इच्छित नोकरी-रोजगार मिळू शकत नाही. थोडक्यात म्हणजे, दोन्ही कारणांचा उद्योग व उमेदवार या उभयतांवर परिणाम होतच आहे. या पृष्ठभूमीवर मुंबईच्या 'भारतीय कौशल्य विकास संस्थे'च्या संदर्भातील पुढील टप्पे महत्त्वपूर्ण ठरतात.

**कौशल्य विकास अभ्यासक्रम व प्रशिक्षण** : राष्ट्रीय स्तरावर विशेष धोरणात्मक बाब म्हणून स्थापन करण्यात आलेल्या या कौशल्य विकास व प्रशिक्षण संस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील कौशल्यविषयक व भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन, कौशल्य प्रशिक्षणाचे नियोजन-आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये 'राष्ट्रीय कौशल्य विकास संस्थे'च्या विहित अभ्यासक्रमानुसार प्रचलित व आवश्यक अशा प्रस्तावित कौशल्य विकासांचा संतुलित समावेश करण्यात आला आहे. या प्रशिक्षणामध्ये विशेष प्रात्यक्षिक व प्रत्यक्ष सरावाचा समावेश असेल.

**उद्योगांचा अधिक आणि सक्रिय सहभाग** : कौशल्य विकास अभ्यासक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थी-उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षणासह त्यांच्या क्षेत्राशी संबंधित असे करीअरविषयक सल्ला-मार्गदर्शन व संधी उपलब्ध होणार आहेत. या कामी संबंधित उद्योग व व्यवस्थापनातील तज्ज्ञ व तंत्रज्ञांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन उपलब्ध झाल्याने याचा मोठा लाभ उद्योग व उमेदवार या उभयतांना होणार आहे. यातूनच कौशल्य प्राप्त उमेदवारांना रोजगार व गरजू उद्योगांना उमेदवार मिळण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.

**व्यापक उद्देश आणि उद्दिष्ट** : 'भारतीय कौशल्य विकास संस्थे'च्या व्यापक उद्देशांमध्ये भारतीय उद्योग-व्यवसायांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेला विशेष गतिमान करण्याचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उद्दिष्टांमध्ये आपल्याकडील विशेषतः अभियांत्रिकी व तंत्रज्ञानविषयक कौशल्यांना जागतिक स्तरावर आपल्या कार्य-कौशल्याला गवसणी घालण्याची क्षमता निश्चितपणे आहे.

थोडक्यात म्हणजे 'भारतीय कौशल्य विकास संस्थे'च्या माध्यमातून कौशल्य विकासाला नव्याने चालना देण्याचे मोठे व महनीय काम होणार आहे. पंतप्रधानांच्या प्रेरणेतून व सरकार आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सक्रिय सहभागातून उद्योग-व्यवसायाच्या राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील कौशल्यपूर्तीसाठी गुणात्मक व दर्जात्मक स्वरूपात आता प्रयत्न होणार आहेत.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### चीनवर सक्त कारवाईची आवश्यकता

चीन हा एकमेव असा देश आहे, ज्याचे शेजारील राष्ट्राशी कोणत्याही प्रकारचे सलोख्याचे संबंध नाहीत. एखाद्या देशाशी छुप्या पद्धतीने युद्ध करणे, सीमा विवाद, अतिक्रमण, जागा बळकावणे आतंकवाद असलेल्या देशाला खतपाणी घालून त्याद्वारे आतंकवादी कारवाया करून दहशत निर्माण करणे अशा पद्धतीची नीती राहिलेली आहे. अशा परिस्थितीत शेजारील देशाने चीनसोबतचे आर्थिक व्यवहार करून त्याच्यावर निर्भर न राहता इतर देशाशी आपले मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करून स्वतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल न होता सद्य:स्थितीला सक्षम होणे गरजेचे आहे. तसेच चीनच्या प्रत्येक आर्थिक धोरणांवर, बाजारपेठेवर, व्यापारावर कठीण असे निर्बंध लादावेत; जेणेकरून अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर स्वरूपाचे परिणाम होतील. अशारीतीने चीनची सर्व बाजूंनी घेराबंदी करून एकटे पाडण्याची गरज निर्माण आहे.

लहान किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या राष्ट्रांना प्रचंड प्रमाणात कर्ज देऊन कालांतराने जमिनीवर कब्जा करून प्रदेश गिळंकृत करण्याचे धोरण अवलंबिण्याचे काम चीन करतो. चीन हा कधीही धोका देणारा देश आहे, त्याच्यावर विश्वास ठेवणे चुकीचे ठरेल.

**मयूर प्रकाशचंद्र बजाज**/९४२१४४९१३०

●● ●●

## वाचक पत्रे

### भारतीय संस्कृतीचे प्रतीक मकरसंक्रांत

सूर्याचा मकर राशीतला प्रवेश आणि त्यादिवशी साजरी होणारी मकरसंक्रांत भारतीय संस्कृतीच्या समृद्धतेचा एक मोठा प्रतीक ठरतो. सूर्याचा हा राशीबद्दल थेट व्यक्तीच्या मनाशी जोडून त्याला आपले आयुष्य समाधानी करण्याच्या दृष्टीने पूरक ठरवले गेले. आणि तसे पाहिले तर या काळामध्ये आकाशमंडलातील पुष्य नक्षत्र चंद्राच्या अगदी समीप असतो आणि म्हणून संक्रांत ज्या महिन्यात येते त्याला पौष महिना म्हटला गेला. म्हणजे सूर्य आणि चंद्राच्या आकाशमंडलातल्या या परिवर्तनाचा संबंध व्यक्तीच्या जीवनाशी जोडण्यामागे



निश्चितच खास उद्देश असला पाहिजे.

हजारो वर्षांपासून सुरू असलेले हे सृष्टिचक्र आणि त्यातले बदल तितक्याच तपश्चर्येने आणि संशोधनाने सिद्ध केले गेले. त्यांचा मानवी मनावर होणारा परिणाम अभ्यासला गेला आणि म्हणूनच त्याचा सणवारांशी संबंध जोडला गेला. मकरसंक्रांत हे अशाच सृष्टिचक्राशी निगडित असलेला सण आहे. या दिवसापासून रात्र लहान होत जाते आणि दिवस मोठा होतो. त्याचे वर्णन करताना तो तिळातिळाने वाढतो. म्हणून मकरसंक्रांतीला तिळगुळाचे महत्त्वदेखील सांगितले गेले. परंतु हा सगळा थंडीचा किंवा हिवाळ्याचा काळ असतो. तिळ हे अतिशय पौष्टिक आणि पाचक खाद्य या कालावधीत सेवन केल्याने त्याचे खूप मोठे परिणाम शरीरावर दिसून येतात. आयुर्वेदामध्येसुद्धा नुसत्या तिळाचे सेवन उपयुक्त मानले गेले आहे. एवढेच नव्हे तर मकर संक्रांतीच्या दिवशी आंघोळीच्या पाण्यात तिळ टाकून स्नान करतात. तिळाच्या तेलातले पदार्थ खातात. अगदी देवालासुद्धा तिळाच्या तेलाचा दिवा लावतात. असा सर्व पैलूंचा विचार करून काही हजार वर्षांपूर्वी सुरू झालेली ही तिळगुळाची परंपरा सूर्यचंद्राच्या संक्रमणाशी जोडून त्याचा मनाच्या प्रसन्नतेसाठी जोडण्याचा हा संस्कार खूप महत्त्वपूर्ण ठरलेला दिसून येतो.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४..

●● ●●

### अस्थिरतेचे सावट दूर झाले

केंद्रातील एनडीए सरकार कार्यकाळ पूर्ण करणार का, या विषयीची संदिग्धता दूर होण्याकरिता गेल्या आठ दिवसांत दोन घटना घडल्या. यावर जास्त चर्चा झाली नाही, पण त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पहिली घटना अशी की, बिहार विधानसभेच्या निवडणुका डिसेंबर २५ मध्ये होऊ घातल्या आहेत. त्याविषयी राजकीय समीकरणे सुरू झाली आहेत.

लालूप्रसाद यादव यांनी नितीशकुमार यांना थेट निमंत्रणही दिले होते. परंतु एका कार्यक्रमाच्या प्रसंगी पत्रकारांनी नितीशकुमार यांना स्पष्ट विचारले असता 'अब इधर-उधर कही नहीं जाना, बहोत भागदौड हुई' असे बोलून संदिग्धता दूर केली. त्याचा परिणाम कार्यकर्त्यांचे मनोबल वाढण्यावर होऊन ते निवडणूक एकदिलाने लढवून युतीचा विजय खेचून आणतील. दुसरी घटना आंध्रप्रदेशातील आहे. पंतप्रधान मोदींनी तेथे तब्बल दोन लक्ष कोटी रुपयांच्या विकास कामाची घोषणा करून आंध्रप्रदेश नागरिकांना आश्वस्त केले आहे. चंद्राबाबू नायडू आणि पवनकुमार यांनादेखील आता युती केल्याचा किती लाभ होतो, याचे महत्त्व पटले असेल. या दोन घटनांनी केंद्रस्थानी असलेल्या एनडीए सरकारचे स्थान अधिक बळकट झाले असून सत्तेची आस लावून बसलेल्या विरोधकांना पुढच्या लोकसभेच्या निवडणुकाचीच तयारी करावी लागणार आहे, हे निश्चित.

**संजय पाठक**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नगर परिषदेच्या नविन अग्नीशामन गाडीचे पूजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

तुळजापूर शहराच्या बाह्य ठिकाणी हद्द वाढ भागामध्ये सद्य परस्थितीला मोठ्या प्रमाणामध्ये नव्याने बांधकाम कामे होत आहेत. नविन अग्नीशामन वहान गाडीची व्यवस्था आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शासन दरबारी प्रयत्न करुन न.प.च्या माध्यमातुन शहरास नविन अग्नीशामन गाडी



उपलब्ध करुन दिली.

या नविन अग्नीशामन वहान उपलब्ध करुन दिल्या बद्दल आ. पाटील यांचे शहवासियांकडुन आभार व्यक्त होत आहेत.

यावेळी पुजन हे महंत वाकोजी महाराज, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, नगरसेवक अमर हंगरगेकर, किशोर साठे, अविनाश गंगणे, औदुंबर कदम, नरेश अमृतराव, भाजपचे शांताराम पेंदे, शुभम क्षिरसागर, कार्यालयीन अधिक्षक वैभव पाठक, अग्निशामन कर्मचारी देविदास देवकते आदींच्या हस्ते पुजन करण्यात आले.

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'ज्ञानज्योती' संस्था सदैव तत्पर : आकांक्षा चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

तालुक्यातील गृहउद्योग चालविणाऱ्या महिला भगिनींनी तयार केलेल्या वस्तूंना चांगली बाजारपेठ उपलब्ध झाल्यास जास्तीत जास्त मालाचा खप होऊन महिला आर्थिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. यासाठीच ज्ञानज्योतीच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी ज्ञानज्योती संस्थेच्या माध्यमातून सदैव तत्पर असल्याची ग्वाही ॲड. आकांक्षा चौगुले यांनी दिली.



ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्था उमरगा, ग्रामऊर्जा फाउंडेशन, अंबाजोगाई, युथएड फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव जिल्ह्यात शनिवार दि.११ ते १२ जानेवारी २ दिवस श्रीराम मंगल कार्यालय, उमरगा येथे उद्योजकता एस समिट २०२५ व मकर संक्रातीनिमीत्त महिलांसाठी भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या समीटमध्ये उमरगा तालुक्यातील जवळपास २८ उद्योजकांनी सहभाग नोंदवत आपल्या उद्योगा विषयी कल्पना सादर केल्या.

यापैकी ५ स्पर्धकांची निवड बेंगलोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय एस समीटसाठी झाली आहे. त्यांना उद्योजक प्रशिक्षण संदर्भात ७ दिवसीय बुटकॅम्प व व्यवसाय विकासासाठी लागणारे मार्गदर्शन मिळणार आहे.

अजित जाधव पाटील जनाई मिल्क प्रॉडक्ट रा. एकोंडी लो., राधा थोरे, सुरभी ब्युटी पार्लर उमरगा, प्रीती दयानंद सुतार, आदर्श महिला उत्पादक गट तुगाव, शुभांगी शाईवाले, शाईवाले अँड ग्रुप, अस्मिता सूर्यवंशी शेवया उद्योग गुंजोटी हे स्पर्धक विजेते ठरले असुन त्यांना उषाताई गायकवाड व पोलीस निरीक्षक आश्विनी भोसले, ज्ञानज्योती संस्थेच्या अध्यक्षा आकांक्षा चौगुले यांच्या शुभहस्ते विजेते प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमात जवळपास १८ विविध साहित्य व खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ज्ञानज्योती संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षा चौगुले, ग्रामऊर्जा फाऊंडेशनचे अध्यक्षा दादासाहेब गायकवाड, प्रा. वर्षा मरवाळीकर, ज्योती चौगुले, नगराध्यक्षा वैशाली खराडे, नगरसेवीका सारीका बंगले, अमर देशटवार आदी उपस्थित होते.

## भवानी रोडवरच पोलिसांच्या प्रायव्हेट वाहनाची बेशिस्त पार्किंग



### जिल्हाधिकाऱ्यांचे नियम धाब्यावर

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

भाविकांना चार चाकी वाहनाचा त्रास होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी यांनी भवानी रोडवरील तिकीट मधून गेटमधून चार चाकी वाहनांना एन्ट्री बंद केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे नियम धाब्यावर बसवून पोलीस प्रशासनाचा मनमानी कारभार चालू असल्याचे चित्र भवानी रोडवरील गेट जवळ बेशिस्त पार्किंग केलेल्या प्रायव्हेट पोलीस वाहनाकडे बघितल्यानंतर लक्षात येते. जिल्हाधिकाऱ्यांचे नियम केवळ जनतेसाठी आणि पोलीस प्रशासनाला यातून सूट दिली का? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला भवानी रोडवर बेशिस्त पद्धतीने पार्किंग केलेल्या या वाहनाकडे बघून पडत आहे.

दि.१३ जानेवारी रोजी संक्रातीनिमित्त महिलांच्या खरेदीसाठी भवानी रोडवर अनेक व्यापाऱ्यांनी रोडच्या मधोमध दुकाने थाटली होती. खरेदीसाठी येणाऱ्या महिलांची तुफान गर्दी तसेच तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या देखील त्याचप्रमाणे अशा गर्दीमध्ये भवानी रोडवरील गेटवरून कुठल्याही चार चाकी वाहनाला एन्ट्री नसताना एक चार चाकी वाहन (क्रमांक एमएच २३/ड ५४९१) हे वाहन गेटमधून एन्ट्री करून गेट जवळच रस्त्याच्या मधोमध बेशिस्तपणे पार्किंग केलेले होते. सदरील वाहनाकडे पाहिले असता गाडीच्या डॅशबोर्डवर पोलिसांची टोपी आणि काचावर पोलिसांचा ट्रेडमार्क असलेला लोगो लावला होता. असं दिसल्यावर भवानी रोडवर कर्तव्यास असणारे ट्राफिक पोलीस देखील अशा वाहनांवर कुठलीही दंडात्मक कारवाई करत नाहीत. दंडात्मक कारवाई केवळ भाविकांच्या वाहनावर केली जाते.

भाविकांना रोडवर लावलेल्या फेरीवाल्यांचे दुकान आणि अशा बेशिस्त लावलेल्या गाड्यामधून वाट काढताना नाहक त्रास सहन करावा लागत होता. जिल्हाधिकाऱ्यांचे नियम मोडणाऱ्या अशा वाहनावर पोलीस जिल्हा अधीक्षक काय कारवाई करणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

## वाशी पोलीस ठाणे हद्दीत स्फोट; बॉम्ब शोधक पथकाची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जानेवारी -**

वाशी पोलीस ठाण्यात ६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अचानक स्फोट झाल्याने मोठा आवाज झाला. स्फोटानंतर बॉम्बशोधक पथकाने सायंकाळपर्यंत तपासणी केली.

परंतु अद्याप पर्यंत स्फोटाचे कारण समजले नाही. स्फोटात अर्ध्या झालेल्या वस्तू व मातीचे नमुने घेऊन प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविले आहेत. पूर्वी पोलीस कर्मचाऱ्यांची घरी होती. त्यात त्या ठिकाणीच पोलीस ठाण्याच्या पूर्वे स्फोट झाला आहे. त्यांच्या शेजारी दुकाने व काही घरे आहेत. शेजारील ग्राहक सेवा केंद्रातील एक महिला कर्मचाऱ्यांच्या डोळ्याला काचेचा तुकडा लागला असल्याचे दिसून येते.

मोठ्या आवाजाने काचा तुटून पडलेल्या आहेत. स्फोट नेमका कशामुळे झाला व कशाचा याचे मात्र अद्याप उघडले नाही. स्फोटाने शेजारील दुकानातील स्किन, काचेची टेबल व इतर काही साहित्य तुटून पडलेले दिसून येत आहे.

बॉम्ब शोधक पथकाला पाचारण करण्यात आले. असून ते आल्यानंतर स्फोटाचे खरे कारण समजून येऊ शकले.

## उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

ऑक्टोबर २०२४ मध्ये श्री तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर येथे शारदिय नवरात्र महोत्सव शांततेत पार पडला. या महोत्सवात सामाजिक सलोखा अबाधित ठेवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता सर्व काही शांततेत पार पडले. या शारदीय नवरात्र महोत्सवात उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

तुळजापूर शारदिय नवरात्र महोत्सव बंदोबस्त यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल पोलीस निरीक्षक रविंद्र खांडेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव, विठ्ठल चासकर, सुरेश नरवडे, पोलीस उपनिरीक्षक विजय थोटे, कल्याण पवार, अनिल धनोरे, पोलीस अंमलदार गोवर्धन माने, अनुप गायकवाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल महादेव राऊत, कमलकिशोर राऊत, रवी भागवत यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तुळजापूर शारदीय नवरात्र महोत्सव बंदोबस्त व्यवस्थेचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि समर्पण खरोखरच कौतुकास्पद गौरवोउद्गार पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी यावेळी काढले.

तुळजापूर येथील शारदीय नवरात्र महोत्सवात नेमुन देण्यात आलेली भुमिका आणि जबाबदाऱ्यांप्रती असलेली बांधिलकीमुळे बंदोबस्त यशात महत्वपूर्ण योगदान दिले असेही ते म्हणाले.

## शाळा, महाविद्यालयांतून होणार जिजाऊ-विवेकानंद विचारांचा जागर; हळदी-कुंकवातही वाटले जाणार पुस्तिकांचे वाण



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

दि.१२ जानेवारी रोजी स्वराज्याच्या प्रेरणास्त्रोत राजमाता जिजाऊ तसेच विवेकवादी, विज्ञाननिष्ठ आणि समाजवादी स्वामी विवेकानंद यांचा जन्मोत्सव देशभर साजरा केला जातो.

या दोन्ही महामानवांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने यंदा उमरगा-लोहारा परिसरातील शाळा व महाविद्यालयांतून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा जागर करण्याचा तसेच हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांतही जिजाऊ-विवेकानंद यांच्यावरील पुस्तिका वाण म्हणून लूटण्याचा महत्वपूर्ण उपक्रम प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाच्या वतीने राबवण्यात येणार आहे. या उपक्रमाची रुपरेषा वाचनालयाचे संकल्पक ॲड. शीतल चव्हाण यांनी मांडली आहे.

या उपक्रमांतर्गत उमरगा-लोहारा परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये न्याय्य स्वराज्याच्या शिल्पकार-राजमाता जिजाऊ या दर्शना पवार लिखित तर विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद या डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर लिखित पुस्तिकेच्या प्रत्येकी ५०० प्रतींचे वाटप केले जाणार आहे. या पुस्तिकांचे शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून वाचन करुन घेवून, त्यावर निबंध लिहून घेवून, भाषणे व परिसंवाद आयोजित करुन जिजाऊ-विवेकानंद विचारांचा जागर केला जाणार आहे. तसेच यंदाच्या मकरसंक्रांती ते रथसप्तमी या दरम्यान होणाऱ्या हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांतदेखील महिलांना या दोन पुस्तिका वाण म्हणून लूटण्यास दिल्या जाणार आहेत.

ॲड. शीतल चव्हाण यांनी मांडलेल्या या उपक्रमास सत्यनारायण जाधव, राजू भालेराव, राजू बटगिरे, ॲड. ख्वाजा शेख, ॲड. अर्चना जाधव, प्रदिप चौधरी, किशोर बसगुंडे, किशोर औरादे, ज्योती माने, करीम शेख, धानय्या स्वामी, प्रदिप मोरे, अनुराधा पाटील, बबिता मदने, शबाना शेख, निर्मला देशमुख, यशोदा पवार आदी सहकाऱ्यांनी अनुमोदन दिले.

## तेर येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१४ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्यातील शासकीय व शासनमान्य सार्वजनिक वाचनालय मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राच्या उपक्रमांतर्गत धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री नरसिंह सार्वजनिक वाचनालयात हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

जिजाऊ मासाहेब यांच्या जयंतीच्या निमित्ताने जिजाऊ मासाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यंकटराव माळी, हनुमंत कोळपे, महादेव आगाशे, दत्ता वैद्य यांचे प्रमुख उपस्थित होती. यावेळी उपस्थित उपस्थित सर्व पत्रकार, ग्रामस्थ, महिला यांना दर्जेदार वाचणे असे पुस्तक भेट देण्यात आले.यावेळी वाचनालयाच्या ग्रंथपाल मिना वसंतराव वडवले, स्वाती भक्ते, संगिता वैद्य, वैशाली सौदागर, अमोल सौदागर, अमोल सावंत यांची उपस्थिती होती.

## उणिवा पूर्ण करताना केलेला संघर्ष इतिहास निर्माण करतो : ममता सपकाळ

### ममता सपकाळ यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार प्रदान...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

माणसाच्या जगण्यामध्ये काही उणिवा असतील तर त्या उणिवा पूर्ण करत असताना जो संघर्ष केला जातो. तो संघर्ष इतिहास निर्माण करतो. अनाथांची माई सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या प्रसिद्ध गजलकार ममता सपकाळ यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार गुरुवर्य हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर आणि गुरुवर्य महंत तुकोजीबुवा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना, असे उद्गार ममता सपकाळ यांनी काढले.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या तुळजाई नगरीत पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर संस्कार भारती प्रदेशाध्यक्षा स्नेहल पाठक, सरपंच परिषद प्रदेशाध्यक्षा जिनत कोहिनूर सय्यद, मंदिर तहसीलदार माया माने, विनय सिंधुताई सपकाळ, पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, शुभांगी पुजारी आदींची उपस्थिती होती.

सत्काराला उत्तर देताना ममता सिंधुताई सपकाळ पुढे म्हणाल्या की, माझी आई मला एक दिवसासाठी आणून द्या, अशी भावस्पर्शी कविता सादर करून आपल्या भावना व्यक्त करण्यास सुरुवात केली महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या चरणी मी पहिल्यांदाच नतमस्तक झाले आहे. मी तुळजापूरकरांचा सदैव ऋणी राहील अशा शब्दात त्यांनी या पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया दिली. माईंनी जे सोसलं त्यामुळेच त्यांनी हे सामाजिक कार्य व सेवा प्रकल्प उभे केले.

जे माईंनी काम सुरू केलं होतं ते आयुष्यभर सुरू ठेवलं तेच काम पुढे सुरू ठेवण्याचा संकल्प आम्ही केलेला आहे आणि माईनचे ते काम आजही त्यांच्याच पद्धतीने चालू आहे हे सांगताना मला माझं मन भरून आला आहे, असेही ममता सपकाळ यांनी सांगितले. पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रा. विवेक कोरे, प्रास्ताविक अनिल आगलावे तर आभार डॉ. सतीश महामुनी यांनी मानले.

या पुरस्कार सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने महिलांसह नागरिकांची गर्दी झाली होती.

### पुरस्काराचे स्वरूप...

तुळजाभवानी मातेला नेसवलेली मानाची पैठणी, कवड्याची माळ, शाल, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे होते. पुजारी नगर फाऊंडेशनतर्फे अनाथ मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी ५१ हजार रुपयाचा धनादेश मान्यवरांच्या उपस्थितीत ममताताईंना देण्यात आला.

## पत्रकार आणि लोकप्रतिनिधी यांनी सकारात्मक दृष्टीकोन बाळगून काम करावे

### सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन...

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१४ जानेवारी -**

चाकूर येथे सिटी प्रेस क्लबच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रातील विविध पुरस्काराचे वितरण राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते दि.१२ जानेवारी रोजी देण्यात आले.



समाजाच्या विकासासाठी पत्रकार आणि लोकप्रतिनिधिंनी हातात हात घालून काम करणे अतिशय महत्वाचे असून यासाठी दोघांनीही सकारात्मक दृष्टीकोण बाळगणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माहिती विभागाचे विभागीय सहाय्यक संचालक डॉ. श्याम टरके होते. याप्रसंगी सत्कारमूर्ती तथा पत्रकारिता पुरस्काराचे मानकरी विभागीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मंगेश डोंग्रजकर यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्या मातोश्री कमलनी अमृतराव डोंग्रजकर, कन्या शर्वरी मंगेशराव देशपांडे, शशिकांत घोणसे पाटील, नरसिंह घोणे आणि संजीव पाटील हे मान्यंवर उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सर्व सत्कारमूर्तींचा सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास काँग्रेसचे विलासराव पाटील, राष्ट्रवादीचे भानुदास पोटे, मुर्तूजा सय्यद, अनिल वाडकर, साईप्रसाद हिप्पाळे, शिवदर्शन स्वामी, बाळू लाटे, गणपत कवठे, हुसेन शेख, शरद किणीकर, ज्ञानेश्वर चाकूरकर, ॲड. संतोष गंभीरे, ॲड. संतोष माने, ॲड. श्रीधर सोनटक्के, विश्वनाथ एडके, विष्णू तिकटे, मोहन कुलकर्णी, संतोष फुलारी, प्रशांत शेटे, संग्राम वाघमारे, सुधाकर हेमनर, गणेश स्वामी, अलीम शेख, अजगर मचकूरी, हाकाणी सौदागर, संदीप शेटे, युनूस सय्यद, प्रा.रमेश शिंदे, तौफिक शेख, अजित सौदागर, मतीन गुळवे, चंद्रमणी सिरसाठ, जाफर सय्यद, शिवाजी शिंदे, शिरीष शिंदे, सचिन तोरे यांच्यासह चाकूर तालुक्यातील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते.

**जाहिरनामा**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र. २०२५/एम.ए.जी/कावि-** **दि.१३/०१/२०२५**
**अर्जदार :- श्रीमती शेख फयाज उस्मानसाब रा. चाकुर ता. चाकुर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकुर ता. चाकुर**
**अर्ज :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्रीमती शेख फयाज उस्मानसाब रा. चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार त्यांची मुलगी **शेख तस्लीम फयाज जन्म दिनांक ०३/०३/१९९८** रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्राम सेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने त्याच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि.लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. १३/०१/२०२५** **पुढील तारीख ३१/०१/२०२५**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित /-**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

**जाहिरनामा**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र. २०२५/एम.ए.जी/कावि-६४०** **दि.१३/०१/२०२५**
**अर्जदार :- श्रीमती शेख शब्बाना महताबसाब रा. चाकुर ता. चाकुर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकुर ता. चाकुर**
**अर्ज :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात **अर्जदार श्रीमती शेख शब्बाना महताबसाब रा. चाकुर, ता. चाकुर जि. लातुर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत त्यांचा स्वताःचा जन्म **दिनांक १३/०९/१९७९** जन्म रोजी राहत्या घरी झाला असून मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने त्याच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत /ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. १३/०१/२०२५** **पुढील तारीख ३१/०१/२०२५**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित /-**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



बीडः मकरसंक्रांतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. महिलांनी सहयोग नगर भागातील श्री गजानन मंदिरात वाणवसा अर्पण करत विधिवत पुजन करून एकमेकींना हळदी-कुंकु दिले. (छायाः श्रीकांत कुलकर्णी)

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तींन्ना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान्न करण्यात येतो.क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणा-या जेष्ठ क्रीडा महर्षीकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडामार्गदर्शकांकरिता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक / जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार ( महिला क्रीडा मार्गदर्शक ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( खेळाडू ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( साहसी उपक्रम ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू ) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासन निर्णय दि.२९ डिसेंबर २०२३ अन्वये दि.२५ जानेवारी २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू, सुधारीत नियमावली २०२३ विहित केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्यापुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू / व्यक्ती यांच्याद्वारा दि.१४ जान्नेवारी ते २६ जान्नेवारी २०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीन्ने अर्ज मागविण्यात येत आहेत.अर्ज सादर करणाऱ्या इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांन्नी विहित मुदतीत क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्क्रोलिंग लिंक ( Scrolling Link ) मध्ये उपलब्ध करून्न दिलेल्या लिंकवर दि. १४ जानेवारी ते २६ जान्नेवारी २०२५ या कालावधीत व दि. २६ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन्न अर्ज सादर करण्यात यावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी - ९६०४९५९६७८ यांच्याशी कार्यालयीन सेवेत संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे, मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर व जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी केले आहे.

# गेवराई महामार्ग पोलिसांकडून रस्ता सुरक्षा सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१४ जानेवारी**

गेवराई महामार्ग पोलिसचे पोलिस निरीक्षक सचिन कापुरे यांनी दि.१४ रोजी रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान २०२५ निमित्त वाहन धारकांना नियम व प्रवासा दरम्यानच्या अडीअडचणी या संदर्भात जनजागृती करून अपघात होणार नाहीत यासाठी माहिती दिली. गेवराई महामार्ग पोलिस केंद्र गेवराई यांच्याकडून रस्ता सुरक्षे संदर्भात विविध उपा योजना करण्यात येतात. सध्या साखर कारखाने सुरू असल्याने महामार्गावर ऊसाचे ट्रॅक्टर मोठ्या प्रमाणात येत आहेत. अनेक वेळा ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला रेडीयम नसल्यामुळे ट्रॉली रोडच्या बाजुला उभी केल्यानंतर वेगात येणाऱ्या वाहनांना अंदाज येत नाही त्यामुळेही अनेक वेळा अपघात होतात. यासाठी ट्रॉलीला रेडीयम लावणे, हायवेला आपल्या वाहनाचा वेग किती असावा, जेणे करून अपघात होणार नाहीत आपली सुरक्षा योग्य राहील या संदर्भात पोलिस निरीक्षक



सचिन कापुरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी रस्ता सुरक्षा अभियान राबवले.



बीड शहरातील भगवान बाबा मंदिर येथे पुण्यतिथीनिमित्त बाबांना विनम्र अभिवादन करताना नवनाथ शिराळे व आत्माराम शिराळे

# कृषी प्रदर्शनासह शेती संबंधीत स्थळांना भेटी देऊन शैक्षणिक सहल उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

आदित्य कृषी महाविद्यालयाची शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली. या दरम्यान विद्यार्थ्यांनी कृषी प्रदर्शनाला भेट देऊन त्यामध्ये आलेले नवनवीन तंत्रज्ञान, त्याचा शेती आणि शेतकऱ्यांना कसा लाभ मिळतो याची इत्थंभूत माहिती घेतली. या सोबत विविध प्रकारच्या पॉलिहाऊस, ग्रीन हाऊस, हायटेक कल्चर मधील विविध प्रकारचे पिक प्रत्याशिके विद्यार्थ्यांनी पाहून त्याचा अभ्यास केला. प्रक्रिया उद्योग, कमी पाण्यावर जास्तीत जास्त शेती करण्यासाठी लागणारे सूक्ष्म सिंचन व तुषार सिंचन सूक्ष्म अभ्यास विद्यार्थ्यांनी केला.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व प्रगतशील भारताच्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना सामाजिक व संशोधन बदल अवगत करण्याच्या विचारधारेनुसार व प्राचार्य श्याम भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य कृषि महाविद्यालयाची शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शैक्षणिक सहल गेवराई येथील कृषी प्रदर्शन, श्री क्षेत्र महा गणपती राजुर जिल्हा जालना व जळगाव येथील जैन इरिगेशन मधील विविध विभागामध्ये भेट देऊन कृषी क्षेत्राच्या निगडित असलेल्या प्रक्रिया विभागाला भेट देण्यात आली. यामध्ये ऐतिहासिक, धार्मिक व कृषि संबंधित स्थळांची माहिती व्हावी या उद्देशाने शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील सहलीत विद्यार्थ्यांनी जैन इरिगेशनचे या नामांकित कंपनिला भेट दिली. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पॉलिहाऊस, ग्रीन हाऊस, हायटेक कल्चर मधील विविध प्रकारचे पिक प्रत्याशिके, प्रक्रिया उद्योग, कमी पाण्यावर जास्तीत जास्त शेती करण्यासाठी लागणारे सूक्ष्म सिंचन व तुषार सिंचनाच्या लागणाऱ्या साहित्याच्या उद्योगालाही भेट दिली. कृषि महोत्सव मध्ये विविध स्टॉल ला भेटी देऊन तेथील माहिती घेतली. आधुनिक हायटेक शेतीचे प्रात्यक्षिक तसेच शेती क्षेत्रातील अद्यावत जागतिक तंत्रज्ञांना बदल व विविध पिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जैन इरिगेशनच्या जैन हिल्सवर पाहण्याची संधी मिळाली. शेती ही नफा मिळवून देणारी व फायद्याची होऊ शकते. याचे साक्षात दर्शन या महोत्सवातून विद्यार्थ्यांना घडले. सदरील सहलीचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य श्याम भुतडा यांच्या नेतृत्वात डॉ. संदीप मोरे, प्रा. पवार के. एस. व प्रा. शिंदे व्ही. बी. यांनी केले. सदरील शैक्षणिक सहलीला जैन इरिगेशनचे इंजिनिअर बाळासाहेब भोसले, खोसरे आणि जैन इरिगेशनचे इंजिनिअर विनोद पवार यांनी सहकार्य केले.

**बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक सहल अत्यंत महत्त्वाची**

बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक सहल अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिक महत्वाचे असते. त्यासाठी आम्ही महाविद्यालयात विविध उपक्रम राबवत आहोत.

-डॉ.आदिती सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था, बीड

# डॉ.बाबासाहेबांनी लिहिलेली राज्यघटना जगाला दिशा देणारी-रवींद्र जोगदंड

## स्वा.सावरकर महाविद्यालयात नामविस्तार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

शिक्षण, आरोग्य, शेती, अर्थव्यवस्था या क्षेत्रातील भरीव योगदाना बरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत अभ्यासपूर्वक लिहिलेली राज्यघटना ही जगाला दिशा देणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा घेऊन प्रत्येक प्राध्यापक, शिक्षकांनी कार्य करावे असे प्रतिपादन उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्टसिटी प्रोजेक्ट तथा उपआयुक्त, महानगर पालिका,छत्रपती संभाजीनगर, रवींद्र जोगदंड यांनी केले. येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात आयोजित ३१व्या नामविस्तार दिनानिमित्त 'नवयुग निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा.चंद्रकांत मुळे हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. पुढे बोलताना रवींद्र जोगदंड म्हणाले की बाबासाहेबांचे विचार हे मानवतेचे होते. अर्थ, शेती, विज्ञान, तंत्रज्ञान, जलतज्ञ म्हणून त्यांचे योगदान मोठे आहे. देशात शांतता असेल तर प्रगती साध्य होते हे बाबासाहेबांना माहीत होते त्यांनी शांतता प्रस्थापित होण्यासाठी पुढाकार घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला दिशा दर्शवणारी भारताची राज्यघटना लिहिली. न्याय, समानता, बंधुत्वाचा हा विषय त्यांनी मांडला. बाबासाहेबांनी केलेले संशोधन हे जागतिक स्तरावरचे आहे. विद्यापीठातील प्राध्यापकांनी त्यातून प्रेरणा घ्यावी असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की बाबासाहेबांनी सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षित समाज प्रगती साधू शकतो हे त्यांना माहीत होते.अध्यक्षीय समारोपात प्राध्यापक चंद्रकांत मुळे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला दिल्याने विद्यापीठाची उंची वाढली आहे. बाबासाहेब ज्ञानाचे प्रतीक होते.त्यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन कंदले यांनी केले.तर आभार डॉ. तात्याराम सोंडगे यांनी मानले. सूत्रसंचालन प्राध्यापक राम गव्हाणे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियाना अंतर्गत महाविद्यालयाच्या ग्रंथालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या ग्रंथांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाची पाहणी मान्यवरांनी केली. या अभियानाच्या बाबतची माहिती ग्रंथपाल अनुजा कास्तीकर यांनी दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक यांची उपस्थिती होती.

# नामविस्तार म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपणे होय-प्रा बोडके

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ जानेवारी**

म.शि.प्रसारक मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. के. सानप होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा. बालाजी बोडके होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य डॉ.उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे,डॉ भाऊसाहेब राठोड, प्रा.सुदर्शन स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी बोलताना प्रा. बालाजी बोडके म्हणाले की, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापीठाला मिळणे हे आपले भाग्य आहे. नामविस्तार आणि ज्ञानविस्तार होणे म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचारांचा वारसा जपणे होय.



कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्यामुळे विद्यापीठाचे भुषण वाढले आहे. यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ .एस. एन. इप्पर यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. अरुण पेंटावार यांनी केले तर आभार प्रा. उमेश राठोड यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी - विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे देशातील विविध मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१४ जानेवारी**

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या वतीने देशातील विविध क्षेत्रातील विविध नामवंत मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून देशाचे ऊर्जा राज्यमंत्री नामदार श्रीपाद नाईक , तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल हे होते. महासभेचे नवनियुक्त अध्यक्ष राजकिशोर मोदी , माजी मंत्री प्रकाश चौधरी, प्रदीप जयस्वाल, सुरेंद्रपाल अहलुवालिया, राजा चौधरी, आमदार श्रीमती अनुपमा जयस्वाल, अटल गुप्ता, अर्चना जयस्वाल, कुमार गौड , यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराचे वितरण अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या राष्ट्रीय महा अधिवेशना दरम्यान वितरित करण्यात आले.

महासभेच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या देशभरातील मान्यवारांमध्ये प्रामुख्याने आमदार प्रदीप शिवनारायन जायसवाल (छत्रपती संभाजीनगर), माजी आमदार तथा माजी राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश नाथुलालजी चौधरी ,(बडी सादडी जिल्हा चितोडगड , राजस्थान), प्रदीपकुमार धिरजलालजी जायसवाल (बडोदा ,गुजरात), जेष्ठ समाजसेवक भरतलाल बाबूलालजी जायसवाल (इंदोर, मध्यप्रदेश), जेष्ठ समाजसेवक ईश्वरचंदजी रामकांतजी साव (मुंबई, महाराष्ट्र) , बी मधूसुदनजी जायसवाल (हैदराबाद ,तेलंगाणा) , लक्ष्मी नारायण परमेश्वर जायसवाल (अकोला महाराष्ट्र) यांचा समावेश होता.

याप्रसंगी संयोजक तथा २०२५-२०२८ चे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी पुरस्कार प्राप्त सर्व मान्यवांचे अभिनंदन करत त्यांनी केलेल्या समाजकार्याचा उहापोह केला. महासभेच्या वतीने पुरस्कारासाठी व्यक्ती निवडतांना देशातील सर्व भागातील समाज बांधवांना समावेशीत करण्याचा प्रयत्न केला गेला



असल्याचे सांगितले. त्याचबरोबर महासभेच्या सर्वोच्च अशा पदासाठी माझ्यासारख्या एक सामान्य कार्यकर्त्यावर विश्वास टाकून माझी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड केली त्याबद्दल मी सर्व समाजबांधव तथा सर्ववर्गीय महासभेच्या सदैव ऋणात राहण्याचा प्रयत्न करून यापुढे समाजास एकसंघ करून त्यास पुढे नेण्याचा प्रयत्न करेन अशी भावना राजकिशोर मोदी यांनी या कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केली.प्रमुख पाहुणे देशाचे ऊर्जा राज्यमंत्री नामदार श्रीपाद नाईक यांनी देखील सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले. संयोजकांनी पुरस्काराला साजेशा व्यक्तींचीच निवड करून त्या पुरस्काराची उंची वाढवल्याचे मत यावेळी नमूद केले. देशभरात बहुतांश ठिकाणी विखुरलेल्या समाजास या अधिवेशनप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी एकत्र आणल्याबद्दल त्याचे कौतुक केले. त्याचबरोबर मोदी हे त्याच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या कार्य काळात समाजाच्या विविध प्रश्नांची उकल महासभेच्या वतीने करतील अशी अपेक्षा देखील नाईक यांनी व्यक्त केली. दिलेल्या पुरस्काराने त्या त्या व्यक्तीची सामाजिक जवाबदारी वाढल्या जाऊन पुन्हा त्यांना आपले सामाजिक कार्य जोमाने पुढे न्यावे लागणार असल्याने या समाजभूषण कार्यक्रम प्रसंगी नमूद केले.

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जयसवाल यांनी निवड झालेल्या या सर्व मान्यवरांनी देशभरात केलेल्या सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना जायसवाल महासभेच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या समाजभूषण पुरस्काराचा वितरण सोहळा रविवार दि १२ रोजी मोदी लर्निंग सेंटर येथे संपन्न झाला. या सोहळ्याला देशभरातून दोन हजारावर जयस्वाल समाज उपस्थित होता.

# नाना सहाणेचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळताच तो आला पोलिसांना शरण

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन येथील बहुचर्चित अवैध गर्भनिदान व गर्भपात केंद्र प्रकरणात नाना सहाणे हा बऱ्याच महिन्यापासून फरार होता. व फरार असताना त्याने दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने ९ जानेवारी रोजी फेटाळला असल्याने शेवटी हा नाना सहाने अखेर जालना पोलिसांना शरण आलाय. भोकरदन येथे डॉ. दिलीपसिंग राजपूत याच्या अवैध गर्भलिंगनिदान व गर्भपात केंद्रावर आरोग्य विभाग व पोलिसांनी ७ जुलै २०२४ रोजी छापा टाकून गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात तब्बल १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये मुख्य सूत्रधार दिलीपसिंग राजपूत याच्यासह १२ जणांना पोलिसांनी आतापर्यंत टप्प्याटप्प्याने अटक केली आहे. मात्र, अद्यापही डॉ. दिलीपसिंग राजपूत यांच्यानंतर महत्त्वाचा असलेला नाना सहाणे हा पोलिसांच्या आतापर्यंत काही हाती लागला नव्हता अशात नाना सहाणे याने अटकपूर्व जमीन मिळावा यासाठी सुरुवातीला जिल्हा सत्र न्यायालयात अर्ज केला होता. तो फेटाळल्यानंतर त्याने छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र या प्रकरणात तपास करणाऱ्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग जालनाच्या पोलिस अधिकारी यांनी या प्रकरणात नाना सहाणे याच्याविरुद्ध असंख्य पुरावे न्यायालयात सादर केले व त्याला अटकपूर्व जमीन देऊ नये म्हणून बाजू मांडली होती. न्यायालयाने त्याचा अर्ज फेटाळला अखेर यामुळे जालना पोलिसांना शरण आला आहे.

### अनेकांची नावे होणार उघड

मागील वर्षी ७ जुलै रोजी येथील अवैध गर्भपात केंद्रावर पोलिसांनी छापा मारला होता. पोलिसांनी १५ जणांवर गुन्हे दाखल केले होते. त्यापैकी १२ जणांना आतपर्यंत अटक करण्यात आली आहे. त्यापैकी १२ जण जामिनावर सुटले आहेत. मात्र, या केंद्राचा मुख्य सूत्रधार डॉ. दिलीपसिंग राजपूत यांचा विश्वासू असलेला नाना सहाणे सहा महिन्यांपासून फरार होता. तो पोलिसांना शरण आल्यामुळे अवैध गर्भपात प्रकरणात असलेले शहरातील डॉक्टर, एजेंट व बाहेर जिल्ह्यातील डॉक्टरांची नावे उघड होणार आहे.

# परतुर व्हॉइस ऑफ मीडियाचा डॉ.बांगड, डॉ.बाहेकर, प्रा.डॉ.दिरंगे, डॉ. दुर्गावाड यांना 'परतूर भूषण' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर तालुका व्हॉइस ऑफ मिडिया या पत्रकार संघटनेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना आज येथील ला.ब.शा. वरिष्ठ महाविद्यालय येथे 'परतूर भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल जेष्ठ डॉ. जी. एम. बांगड, डॉ. एस. जी. बाहेकर, डॉ. एल. पी. दुर्गावाड यांना परतूर भूषण पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते दिला. तसेच साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, पोलीस प्रशासनातील योगदानाबद्दल पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांना ही 'परतूर भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावेळी पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे जिल्हा कार्यकारिणी व परतूर पदाधिकारी यांनी शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. कार्यक्रमाचे संचालन अध्यक्ष अजय देसाई यांनी केले,



कार्यक्रमाला डॉ. प्रा भारत खंदारे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या वेळी व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा कार्यकारिणी अध्यक्ष अविनाश कवळे जिल्हा कार्याध्यक्ष अहेमद नूर, जिल्हा सरचिटणीस राजेश भालेराव, रवींद्रजी दानम, पो. उप निरीक्षक श्री विठ्ठल केंद्रे, सायबर शाखेचे पो. नि. चव्हाण डॉ. शैलेंद्र शेलार व महाविद्यालय चे प्राध्यापक यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी डॉ बाहेकर यांनी कालची व आजची वैद्यकीय सेवेबाबत माहिती देताना समाजसेवा महत्वाची असल्याचे सांगितले. या प्रसंगी प्रा डॉ भगवान दिरंगे यांनी साहित्य संस्कृती आणि वान्मय यावर प्रकाशझोत टाकला, अध्यक्षीय समरोप प्राचार्य डॉ भारत खंदारे यांनी केला. शेवटी आशिष गारकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्हॉईस ऑफ मिडियाचे अध्यक्ष अजय देसाई, सचिव अर्जुन पाडेवार, कार्याध्यक्ष केदार शर्मा, उपाध्यक्ष कैलास सोळंके, अर्जुन नायक, सहसचिव माणिक जैस्वाल, कोषाध्यक्ष भाऊसाहेब मुके, संघटक आशिष धुमाळ, सहसंघटक सर्फराज नाईकवाडी, सल्लगार एम. एल. कुरेशी, माजी अध्यक्ष भारत सवने, आशिष गारकर सदस्य अशोक सकळकर, अशोक ठोके, राजाभाऊ भद्रगे यांच्यासह इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### सारथी पुणे आणि जगदंबा इन्फोटेक तळणी यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वच्छता अभियान



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज युवा व्यक्तिमत्व कौशल्य विकास कार्यक्रम सारथी पुणे आणि जगदंबा इन्फोटेक तळणी यांच्या वतीने राजमाता जिजाऊ जन्मोत्सव निमित्त सिंदखेडराजा येथे स्वच्छता अभियानाची कार्य संपन्न झाले .यामध्ये जगदंबा इन्फोटेक तळणी येथील सारथी च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानामध्ये सहभाग नोंदविला यावेळी राजमाता मा साहेब यांना अभिवादन करून स्वच्छता अभियानाची सुरुवात झाली सिंदखेडराजा येथे लाखोच्या स्वरूपामध्ये महाराष्ट्रातून मावळे जिजाऊंना वंदन करण्यासाठी येत असतात आणि या पवित्र भूमीमध्ये महाराष्ट्रातून आलेल्या लाखो जनसंख्या मुळे परिसरा अस्वच्छ होऊ शकतो त्या अनुषंगाने सारथी पुणे या संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व विद्यार्थी आणि लाभार्थ्यांनी या ठिकाणी राजमाता मा साहेब जिजाऊ महोत्सव सिंदखेडराजा येथे स्वच्छता अभियान राबविले या कार्यक्रमाला सारथी पुणे चे मॅनेजिंग डायरेक्टर अशोक काकडे सर (ख-ड) सारथी चे सर्व पदाधिकारी चघउङ चे सर्व पदाधीकारी आणि जगदंबा इन्फोटेक चे संचालक वासुदेव लाड सर व त्यांच्या समवेत संस्थेतील सर्व विद्यार्थीनी या स्वच्छता अभियानामध्ये सहभाग नोंदविला.

### राष्ट्रीय युवा सप्ताहाचे उद्घाटन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन व युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने जीवनराव पारे विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. या कार्यक्रमास माधव बद्रे, क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे, रेखा परदेशी, विजय गाडेकर, राहुल गायके, हारुण शेर खान हे मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कु. वैष्णवी खडके, ख़ुशी कुऱ्हे, कु. समिक्षा रत्नपारखे, कु. प्राजक्ता माने यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कु राणी दणके, दिव्या सरोदे, प्रतीक वाघमारे, दिव्या खांडेभराड, दिव्या वांगे, दिव्या कऱ्हाळे, भक्ती दैने, अंजली आदमाने, पल्लवी आदमाने, प्रीती शिंदे, शिल्पा खरात, दिव्या पिंपळे या विद्यार्थ्यांनी समयोचित भाषणे केली तर क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे यांनी आपल्या भाषणातून स्वामी विवेकानंद यांची यथोगाथा सांगितली.



राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव निमित्त जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या निवासस्थानी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग जिल्हा अध्यक्ष अब्दुल रफीक रशीद, ज्येष्ठ काँग्रेस नेते किशन जेठे, नम्रता जैस्वाल,नितीन जैस्वाल, योगेश पाटील, दत्ता घुले,शेख शमशुद्दीन,अमोल सरोदे,राम चौव्हान,राजेश पवार,अरुण घडलिंग,शेख मुशताक, शेख गुलाब,शेख इर्शाद, चंद्रकांत रत्नपारखे,मिर्ज़ा अरशद,करीम बिल्डर आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊंची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांची जयंती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हा कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण, प्रदेश चिटणीस शकुंतलाताई कदम, माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई चव्हाण, सौ. छायाताई विनयकुमार कोठारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, मिर्झा अनवर बेग , धैर्यशील चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांनी केलेल्या आदर्श कार्यावर मार्गदर्शन केले . अरविंदराव चव्हाण बोलताना म्हणाले की, आई कशा असाव्यात याचे उत्तम उदाहरण म्हणून भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात त्यांचे नाव घेतले जाते.



इतकी वर्ष होऊनही त्यांचे नाव अद्याप कायम आहे.छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांनी बालपणापासून स्वराज्याचे बाळकडू दिले त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव ही जगात अजरामर झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती वैशाली फोके यांनी तर आभार प्रदर्शन गजानन सोनसळे यांनी केले. याप्रसंगी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, कामगार आघाडीचे सतीश वाहुळे,न्याय विभागाचे एडवोकेट विद्यासागर दावणगावकर, जिल्हा उपाध्यक्षा संगीता नागरगोजे,युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, गीतांजली ढवळे, संगीता झाडीवाले ,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष रोहित अग्रवाल, वैभव नालेगावकर, अमोल खरात, सुरेश सपाटे, कविता भोरे,सविता भोरे ,सविता मुळे, संतोष ढेंगळे,उमेश मोहिते, पद्माकर हांडे , लक्ष्मीकांत डोंगरे, कैलास डवले ,इमरान शेख ,बद्रीनाथ क्षिरसागर, विजय सोनवणे, नवनाथ लोखंडे, संतोष पुंगळे ,प्रतापराव शिंदे, इंद्रजीत साबळे ,सतीश फतपुरे,सचिन आढे, वसंत घुगे, संतोष घडे, सिद्धू शिंदे, समाधान राठोड, मच्छिंद्र राठोड, राहुल राठोड, मुक्तार पठाण, आकाश श्रीरामवार, समीभाई, गणेश डुकरे, युनूफ शेख, राम डोंगरे, फेरोज चौधरी, ज्ञानेश्वर शिंदे, यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मंठा मंडळ अतिवृष्टी अनुदानातून वगळल्याने शेतकरी आंदोलनाच्या तयारीत

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यात सप्टेंबर २०२४ यामहिन्यात संपूर्ण अतिवृष्टी झाली होती.त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या बाबत वरिष्ठ अधिकारी पदाधिकारी तसेच आमदार, खासदार आणि विरोधी पक्ष नेते यांनी देखील मंठा तालुक्यातील, मंठा मंडळातील बहुतांश गावांना भेटी दिल्या होत्या, पंचनामे झाले होते आणि सरासरी मदत शानाकडून देण्यात येईल असे अश्वासन दिले होते. परंतु सत्ताधारी , विरोधकांचे दौरे सगळे फोफ ठरले असून शेतकऱ्यांच्या पदरी शेवटी निराशा आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता आंदोलनाची हत्या उपसण्याचे ठरविले आहे



याबाबत मंठा तहसीलदार यांना निवेदन देखील दिले आहे.

शासनाकडून नुकतीच सदरील नुकसानीची यादी जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये मंठा मंडळ वगळण्यात आले आहे. ही मोठी दुर्देवी बाब आहे. आम्हा शेतकऱ्यांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. परंतू शासनाने कोणते निकष लावले आहेत. की ज्यामध्ये मंठा मंडळ वगळण्यात आले आहे. त्यामुळे मंठा तालुक्यातील शेतकरी अडचणीत आले आहेत. मंठा मंडळाचा तात्काळ समावेश करण्यात यावा. नसता तहसील कार्यालयासमोर मंठा मंडळातील शेतकऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे या निवेदनावर दत्ता बोराडे यांच्यासह शहरातील अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राष्ट्रमाता जिजाऊ आऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**प्रतिनिधी/वाटुर**

मंठा तालुक्यातील वाई जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा येथे आज दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ आऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री संतोष सरकटे सर आणि प्रमुख अतिथी श्री नारायण उबाळे शाळेय समिती अध्यक्ष हे विराजमान होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी उबाळे या विद्यार्थिनी केले सर्वप्रथम राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले



यामध्ये श्रेया,रिया प्रधान, सिद्धी कावळे, श्रावणी गोळे, रूपाली प्रधान ,प्रतीक्षा खंदारे ,मयुरी उबाळे, श्रुती चौंडे, दुर्गा खंदारे ,या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषणे केली आणि शेवटी जिजाऊच्या जीवनावर आधारित प्रतीक्षा खंदारे श्रावणी गोळे श्रुती चौडे आणि ज्ञानेश्वरी उबाळे यांनी सुंदर गीत सादर केले कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांची वाचणे आणि जिजाऊ च्या वेशात चंद्रकोरीचे दर्शन सुखव्ह व आणि अभिमानास्पद होतं.

# भरधाव वाळूचे दोन टेम्पो शिरले गावात; ५० हुन अधिक बालकांसह अनेकजण बालंबाल बचावले

## वाळू रस्त्यांवर टाकुन काढला पळ पण, अखेर ग्रामस्थांनी पाठलाग करुन दोन्ही टेम्पो पकडले

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

पुर्णा नदीकाठच्या वाघाळा - टाकळखोपा - इंचा गांवच्या हद्दीतून वाळू ने भरले दोन टेम्पो अचानक भरधाव वेगाने तळणी गावांत शिरल्याने मारोती मंदिर परिसरात सर्कस शो कार्यक्रमानिमित्त जमलेले ५० हुन बालकांसह महिला- पुरुष थोडक्यात बालंबाल बचावले. ही घटना ( ता. ११ ) रोजी सायंकाळी ६:३० वाजे दरम्यान समोर आली.

वाघाळा - टाकळखोपा या मार्गाने पुर्णा पाटी मार्गे तळणी-लोणार कडे दिवसाढवळ्या अवैध वाळू वाहतूक सुरू आहे. शनिवारी सायंकाळी ६ :१५ वा पुर्णा पाटीजवळ महसूलच्या पथकांला पाहून दोन वाळु वाहतुकीच्या टेम्पोनी लोणार कडे न जाता अचानक तळणी गावांत शिरल्याने भरधाव टेम्पो चालवत लहान मुलं , वयोवृद्ध महिला- पुरुष व तरुणांच्या जिवाला धोका निर्माण करत शिरपूर मार्ग कोकरबा गावातुन पळ काढला. या दरम्यान तळणी गावात सर्कस शो असल्यामुळे पन्नासहून अधिक



लहान मुले , महिला- पुरुष रस्त्यालगत हजर होती. भरधाव वेगाने वाळू वाहतूक करणारे दोन टेम्पो समोर येतात. अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला . देव बलंतर म्हणून अनेकजण बालंबाल बचावले. या घटनेनंतर ग्रामस्थांनी बस स्टँड भागात एकत्रित येऊन रोष व्यक्त केला . गावांतील काही तरुणांनी 'त्या' टेम्पोचा पाठलाग करून अखेर त्यांना पकडले. संतोष सरकटे , बद्री हनवते , ज्ञानेश्वर सरकटे , केशव येऊल , नारायण सोनुने यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला. तळणीत अचानक गावात भरधाव वाळू चे टेम्पो चालवून लहान मुले , महिला व नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण केल्याप्रकरणी आक्रमक झालेल्या तरुणांनी पाठलाग करून दोन्ही टेम्पो पकडुन मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे व मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी यांच्यासह अन्य कर्मचाऱ्याचा ताब्यात दिले. महसुल च्या ताब्यात दिलेला एक टेम्पो फराल झाला... यांना वरद हस्त आहे तरी कोणाचे तळणी परीसरात वाळू माफिया यांनी हैदोस घातला आहे

११२ वर संपर्क साधला पण, पोलीस मद्दत मिळाली नाही. ग्रामस्थांनी ११२ वर संपर्क केला असता , पोलीसांकडून मद्दत मिळाली नाही. असे उध्दवसेनेचे तालुका उपप्रमुख ज्ञानेश्वर सरकटे यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा आज होणार सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ जानेवारी**

महाराष्ट्रात महान खेळाडू व स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तीक ऑलिम्पीक पदक विजेते खाशाबा जाधव यांचे क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदान विचारात घेता व त्यांच्या स्मृतीना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिन १५ जानेवारी २०२५ हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी सायंकाळी ४ वाजता पिपल्स कॉलेज मैदान, जिल्हा क्रीडा संकुल नांदेड व जिल्ह्यातील विविध शाळा येथे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनिय कामगिरीची दखल घेवून जिल्ह्यातील खेळाडूंचा मान्यवरांच्या



हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी जिल्ह्यातील खेळाडूं, क्रीडाप्रेमी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना करणे आणि जनतेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्हयात दरवर्षी १२ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह तसेच महान क्रीडापटू दिवंगत मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी म्हणजेचे २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो.

याच धर्तीवर सन १९५२ मध्ये हेलसिंकी, फिनलंड येथील ऑलिंपिक स्पर्धेत स्वंतत्र भारताचे पहिले वैयक्तीक ऑलिपिंक पदक कास्य पदक जिंकणाऱ्या महान कुस्तीपटू दिवंगत खाशाबा जाधव यांच्या राज्यासोबतच देशाचा गौरव वाढविणाऱ्या कामगिरीस सातत्याने उजाळा मिळावा तसेच त्यातून राज्याच्या विद्यमान व नवीन खेळाडूंनी प्रेरणा घ्यावी यासाठी त्यांचा जन्मदिन राज्याचा क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात यावा अशी मागणी शासनाकडे होत होती. या अनुषंगाने राज्याचे मुख्यमंत्री यांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन म्हणजेच १५ जानेवारी हा दरवर्षी राज्याचा क्रीडा दिन म्हणून साजरा केला जाणार आहे.

# मराठी ही जागतिक भाषा व्हावी -डॉ. पाटील

## विद्यापीठात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उपक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ जानेवारी**

'मराठी ही केवळ महाराष्ट्राची भाषा नसून ती जागतिक व्यवहाराची भाषा बनायला हवी' असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. एम. के. पाटील यांनी केले. महाराष्ट्र शासन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल यांच्या वतीने दि.१४ ते २८ जानेवारी या कालावधीत संपन्न होणाऱ्या 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या विशेष उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी विद्यापीठातील ज्ञान स्रोत केंद्रामध्ये मराठी भाषेतील काही अभिजात ग्रंथांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. हनुमंत कंधारकर, भाषा संकुलाचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण, मराठी विभाग प्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर, मराठी भाषा अधिकारी डॉ. पी. विठ्ठल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक डॉ. पी. विठ्ठल यांनी केले. सूत्रसंचालन ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी तर आभार डॉ.दिलीप चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. रमेश ढगे, डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. नीना गोगटे, प्रा. झिशान अली यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### देगलूर महाविद्यालयाच्या बारावी, कला व वाणिज्य विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**देगलूर**-शहरातील देगलूर महाविद्यालय देगलूर येथील विद्यार्थ्यांनी शिक्षण कालावधीतच भरपूर अभ्यासाची मेहनत घेतल्यास पुढील जीवन सुकर होते असे प्रतिपादन देगलूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा उदगीर येथील पोलीस उपनिरीक्षक अक्षय पाटील यांनी केले. पोलीस उपनिरीक्षक पाटील हे अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाच्या इयत्ता बारावी कला वाणिज्य शाखेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बेम्बरेकर होते. व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारणी सदस्य देवेंद्रसेठ मोतेवार, प्राचार्य डॉ.मोहन खताळ, उपप्राचार्य प्रा.डॉ ए.बी.चिद्रावार, चमकुडे एम एम.प्रा.डॉ शेरीकर व्हि.जी., पर्यवेक्षक एस.एन. पाटील हे उपस्थित होते विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मेहनत एकाग्रतेने अभ्यास करून गुणवत्ता मिळवावी. पुढील स्पर्धा परीक्षेला सामोरे जात यशस्वी व्हावे आणि जीवन सुकर करून घ्यावे असे प्रतिपादन पोलीसउपनिरीक्षक पाटील यांनी करत आपण ग्रामीण भागातून येऊन देगलूर महाविद्यालयात शिक्षण घेतले असून याच महाविद्यालयाने मला घडविले आहे. सच्ची मेहनतच विद्यार्थ्यांना भावी जीवन सुकर करून यशस्वी करते.सांगून त्यांनी त्यांचा पूर्ण शैक्षणिक अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडला. प्रारंभी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली यानतंर गौतम भालेकर, प्रकाश सोनकाबंळे यांनी भजन गीत गायन सादर केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील यांनी केले .उपप्राचार्य चमकुडे एम एम यांनी विवेकानंदाच्या विचारातून युवकानी घडले पाहिजे असे मनोगतात म्हटले. उपप्राचार्य शेरीकर व्हि.जी. व प्रा.डॉ धनराज लझडे यांची समायोचीत भाषणे झाली. यावेळी बारावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालय राबवीत असलेल्या विविध उपक्रमाविषयीचे मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात देवेंद्रसेठ मोतेवार यांनी बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष वानोळे तर आभार प्रा. रत्नाकर चिद्रावार यांनी मानले यावेळी बारावी शिकत असलेल्या कला वाणिज्य शाखेचे विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी प्रा.तुकाराम लागले, प्रा.नागरगोजे, सिताराम हाके प्रा.भाऊराव नाईक, प्रा.चंद्रशेखर बाकेवाड, प्रा.दासरवार तुकाराम प्रा.शिवचरण गुरूडे आदिंनी मदत केली.

### प्रलंबीत प्रश्न मार्गी लावण्यात सुनील अनंतवार यांना यश

**नांदेड**-नवीन कौठा येथील कुशी नगर मध्ये मोठ्या संख्यने दलित समूहातील लोकं वास्तव्यास आहेत. तेथे नाली, ड्रेनेज आणि पिण्याच्या



पाण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबीत आहे. राष्ट्रीय कलाल गौड तेलंग समाज युवा संघर्ष समितीचे राज्य अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते सुनील अनंतवार व त्यांच्या सोबत असलेले नवीन कौठा येथील युवक जय लव्हाळे, जळबाजी सोनकांबळे, राहुल हैबते, उत्तम कांबळे, सचिन कांबळे, योगेश भुतके , भैय्यासाहेब दुंडे यांनी मागील दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला असून त्यांच्या पाठपुराव्यास यश येताना दिसत आहे. अनंतवार यांनी महापालिकेवर घागर मोर्चा काढण्याचा इशारा दिल्यामुळे आणि यापूर्वी निवेदने दिल्याने मनपाच्या मलनिस्सारण आणि पाणी पुरवठा विभागाने दखल घेतली आहे. सुनील अनंतवार यांनी कुशी नगर व म्हाडा कॉलनी येथील सि. सी नाली, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, तसेच नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याचा विषय व पथदिवे,,कचऱ्याचे व्यवस्थापन असे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत.

# प्रशासनाला सोबत घेऊन जनतेच्या समस्यांचे निराकरण करणार : आ. बाबुराव कोहळीकर

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. १४ जानेवारी**

हिमायतनगर तालुक्यातील सर्व जनतेच्या समस्यांचे निवारण करणे आपले कर्तव्य समजून काम करीत असून, पाठीमागच्या काळात जे कोणी अधिकाऱ्यांनी वेळेवर कामे केली नाहीत. त्यांनी आपल्या कामात तात्काळ सुधारणा करावी. त्यांना आठ पंधरा दिवसांचा कालावधी देतो, त्यांनी आपल्या कामात सुधारणा करून कामाची गती वाढवावी. यापुढे मी स्वतः या सर्व कामात लक्ष घालून कामे पुर्ण करणार आहे. प्रशासनाला सोबत घेऊन जनतेच्या समस्येचे निराकरण करून, जनतेच्या आशीर्वादाची उतराई विकास कामे करून करणार आहे. असे प्रतिपादन आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी केले.



हिमायतनगर येथील तहसील कार्यालयासमोर ता. १३ आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली आमसभा ( जनता दरबार ) संपन्न झाला. या वेळी आयोजित कार्यक्रमात आमदार कोहळीकर बोलत होते. आमदार महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पाणी पुरवठा नियोजन कृती आराखडा बैठकीत मात्र तक्रारीचा मोठ्याप्रमाणात पाऊस झाला.

एकंबा, हे गाव चर्चेत अग्रस्थानी होते. अनेक गावांच्या नागरीकांनी आमदार महोदयाकडे तक्रारीचा पाढा वाचला. आगामी उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाई करीता उपाय योजना आखून सरपंच व ग्रामसेवकांनी समन्वयाने काम करून पाणीटंचाई निवारणाचे काम करावे अश्या सुचना आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी प्रशासनाला केल्या आहेत. व तसेच पाणी पुरवठा कृती आराखडा २०२५ तयार करण्यात आला. तालुक्यातील ५२ ग्रामपंचायतींच्या पाणी टंचाई चा प्रश्न आमदार महोदयाकडून चर्चेत झाला. त्यानंतर अनेक समस्या नागरीकांनी मांडल्या. आणी त्या समस्या सोडविण्याचे आश्वासन आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी दिले.

प्रास्ताविक गटविकास अधिकारी जाधव यांनी केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, जि. प. चे माजी उपाध्यक्ष गंगाधर पाटील चाभरेकर, माजी बांधकाम सभापती प्रतापराव देशमुख सरसमकर, सभापती बालासाहेब कदम, उपविभागीय अधिकारी कांबळे, बबनराव कदम, युवासेनेचे जिल्हाप्रमुख संदेश पाटील हडसनीकर, सुदर्शन पाटील मनूलेकर, संजय गांधी निराधार समिती अध्यक्ष विजय वळसे पाटील, तहसीलदार पल्लवी टेमकर, माजी जि.प सदस्य संभाराव लांडगे, विकास पाटील देवसरकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजू पाटील भोयर, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ ठाकरे, गजानन तुप्तेवार, गजानन चायल, आशिष सकवान, सत्यवृत ढोले, बालाजी राठोड, राष्ट्र वादी तालुकाध्यक्ष अभिषेक लुटे, कैलास राठोड, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख सितल भांगे, राम भाऊ सुर्यवंशी, गौरव सुर्यवंशी, गणेश शिंदे, पवन करेवाड, प्रभाकर मुधोळकर, लक्ष्मण जाधव, माजी उपनगराध्यक्ष म. जावेद अ.गण्णी, आदिसह अधिकारी, पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठ्याप्रमाणात उपस्थिती होती.

# खोदून ठेवलेले रस्ते तात्काळ दुरूस्त करा



**गणेश जैस्वाल यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. १४ जानेवारी**

इस्लापूर गावात पाईपलाईन लाईन खोदकाम करण्यासाठी रस्ते खोदलेले आहेत. या अंतर्गत रस्त्यावर धड पायी चालणे अवघड झाले असून, मोटारसायकल वाहण घसरून पडून, रोजच किरकोळ अपघात घडत आहेत. एखादा गंभीर अपघात होण्याची शक्यता ही नाकारता येणार नाही. भविष्यात होणारी हानी लक्षात घेता खोदकाम केलेले रस्ते तात्काळ दुरूस्त करून द्यावे. अशी मागणी इस्लापूर येथील जेष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गणेश जैस्वाल यांनी केली आहे.

इस्लापूर येथे जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू आहे. सदरील कामावर देखरेख करणाऱ्या जल प्राधिकरण विभागाच्या अभियंत्यांना मॅनेज करून ठेकेदार हे अतिशय बोगस व निकृष्ट दर्जाचे काम जनतेच्या माथी मारण्यात येत आहे. या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामांच्या असंख्य तक्रारी आहेत. परंतू गेंड्याची कातडी ओढवून बसलेले संबंधित प्रशासन ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करायला जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहे. सध्या गावातील अंतर्गत रस्त्याची इतकी वाताहत झाली की, रस्त्याने पायी चालणे जिकरीचे बनले आहेत. अनेक अबाल, वृद्ध पडून जखमी झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. परंतू ठेकेदार ह्या रस्त्याची कामे करायला तयार नाही. एक तर पाणी नाही. रस्ते ही खराब करून टाकले असल्याने जनतेत तिव्र स्वरूपाचा असंतोष पसरला आहे. या गंभीर बाबीकडे संबंधित प्राधिकरण मंडळ विभागाचे अधीक्षक अभियंता श्री पाटील व तसेच जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी तात्काळ लक्ष पुरवून सदरील ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकून कामावर देखरेख करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेचे कान टोचावेत. अशी मागणीही सामाजिक कार्यकर्ते गणेश जैस्वाल यांनी केली आहे.

# तालुक्यातील दिव्यांग निराधारांना वेळेवर मानधन देण्यात यावे : प्रहार संघटनेची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १४ जानेवारी**

मुदखेड तालूक्यातील दिव्यांग बांधवांना ४०% च्या वरिल व अडिच एकरचा जीआर असताना संजय गांधीचा लाभ आणि दिव्यांग, निराधारांना वेळेवर मानधन देण्यात यावे यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने तहसीलदार आनंद देऊळगांवकर यांना निवेदन देण्यात आले.

तालुक्यातील ४०% च्या वरिल शासनाने दिलेले प्रमाणपत्र ग्रहित धरून व त्यांची येण्या - जाण्यासाठी होणारी हेळसांड थांबवून संबंधीत अधिकारी यांनी संजय गांधीचा योग्य पद्धतीने लाभ मिळवून द्यावा व अडीच एकर शेती असलेल्या दिव्यांग बांधवांना व एक एकर शेती असणाऱ्या विधवा महिलेला संजय गांधी योजनेचा लाभ मिळवून देण्यात यावे व तसेच चार पाच महिने झाले दिव्यांग, निराधारांना दर महिण्याला मिळणारे मानधन महिण्याच्या १/२ तारखेला मिळत नसल्याने तालुक्यातील दिव्यांग निराधारांना उपासमारीची वेळ आली आहे.

यातच कोणताही दुकानदार त्यांना उधारी माल देत नाही त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ देऊ नये यासाठी कर्मचाऱ्यांना वेळीच सुचना देऊन मानधन त्यांच्या खात्यात जमा करावे अन्यथा प्रहार संघटनेच्या वतीने उपोषण व तिव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.

यावेळी प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल पाटिल शेटे, प्रहार जनशक्ती प्रमुख शंकर पाटिल शिंदे, प्रहार महिला अध्यक्षा सौ. केशरताई शिंदे, प्रहार शहराध्यक्ष गोविंद लोणे, प्रहार तालूका सचिव साहेबराव निवडंगे, यासह दिव्यांग बांधव व निराधारांची उपस्थीती होती.

## पंढरीनाथ बोकारे यांना बाळशास्त्री जांभेकर दर्पणकार पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ जानेवारी**

मागील ३७ वर्षा पासून पत्रकारिता क्षेत्रात अग्रेसर असलेले नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार श्री पंढरीनाथ बोकारे यांना २०२४ चा 'बाळशास्त्री जांभेकर दर्पणकार' पुरस्कार जाहीर नासिक येथे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. सक्षम टाइम्स मिडिया फाऊंडेशन व सक्षम पोलीस टाइम्स वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार दिला जातो. नाशिक येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीमित्त या पुरस्कारांचे वितरण केले गेले. श्री बोकारे याना पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील योगदाना बद्दल यापूर्वी जवळपास ४० विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदानासाठी अर्ज भरण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ जानेवारी**

नांदेड जिल्ह्यातील सामान्य शाळेत इयत्ता १ ते १० वी मध्ये शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेसाठीचे अर्ज मुख्याध्यापकांनी महाडिबीटी प्रणालीद्वारे भरण्याची कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी केले आहे.

शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांप्रमाणे शालांत पूर्व शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यासाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये महाडिबीटी प्रणालीद्वारे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज स्विकारण्याची सुविधा उपलब्ध करुन आलेली आहे. यासाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये सामान्य शाळेतील इयत्ता १ ते १० वी मध्ये शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अर्ज सादर करावेत. यासाठी शाळास्तर मुख्याध्यापकांनी युजर आयडी-prešschool Udise noš principal पासवर्ड- pass१२३ याप्रमाणे दिला आहे.

# नायगाव शहरात रक्तदान महायज्ञ शिबिर

## दहा दिवसांत ८४ हजार रक्त दात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. १४ जानेवारी**

राज्यात ४ ते १९ जानेवारी या पंधरवड्यात जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने रक्तदान महायज्ञ शिबिर आयोजित करण्यात येत असून त्या अनुषंगाने नायगाव शहरातील ग्रामीण रुग्णालयात दि.१६ जानेवारी २०२५ रोज गुरुवारी सकाळी ८ वाजता रक्तदान शिबिरा चे आयोजन करण्यात आले असून या रक्तदान शिबिरा चा लाभ युवकांनी व भक्तांनी घ्यावा असे आवाहन तालुका सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या प्रेरणेने राज्यात दि. ४ ते १९ जानेवारी या पंधर वड्यात जवळपास १ हजार कॉपच्या माध्यमातून महारक्तदान महायज्ञाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात १ लाख रक्त बाटल्या संकलनाचे उद्दीष्ट्ये ठेवण्यात आले असून एक लाख बाटल्या महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, गोवा व गुजरातला येथील शासकीय मान्यताप्राप्त बल्ड बँकेला देण्यात येणार आहे. सामाजिक उपक्रम मार्फत गोरगरीब गरजू पेशंटला हे रक्त पुरवले जाते. त्याचबरोबर देहदान,मोफत अम्बुलेस सेवा, स्वच्छता अभियान असे अनेक सामाजिक उपक्रम जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या संस्थानाच्या माध्यमातून राज्यात राबविणत येत आहे.



जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानाचा स्तुत्य उपक्रम

त्यापैकी हा अतिशय महत्वाचा उपक्रम म्हणजे रक्तदान असून दि.४ ते १४ जानेवारी या दहा दिवसांत ७४७ शिबिरे घेण्यात आले यात ८४ हजार -रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. अशी माहिती नांदेड जिल्हा निरीक्षक तथा तेलंगणा पिठाचे पिठ प्रमुख काकासाहेब वनारसे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

त्या अनुषंगाने नायगाव शहरातील उप विभागीय ग्रामीण रुग्णालयात दि.१६ जानेवारी रोजी सकाळी ८ ते ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. या रक्तदान महायज्ञ शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन नायगाव तालुकाध्यक्ष तालुकाध्यक्ष शेषेराव नारसनवाड, सचिव शेषेराव कंधारे,महिला अध्यक्ष गंगाबाई डाके, ज.न.म.प्रर्वचनकर गंगाधर कोकणे,सुधाकर साखरे, ज्ञानेश्वर मोरे, इंगळे, विश्वजित फुलारी,व्यंकटराव पवारे, गोविंद एसके,राजु म्हात्रे, लक्ष्मण पुपलवाड, त्र्यंबक कानगुले,शिवराज पाटील, मारोती शिंदे पळसगाव, सुभाष पेरके सह स्व स्वरूप संप्रदाय तालुका कमिट नायगाव तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# दक्षिण मतदार संघाच्या विकासासाठी कुठेही कमी पडणार नाही - आ. आनंद बोंढारकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १४ जानेवारी**

नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांचा दिनांक १३ जानेवारी रोजी भायगाव, किकी, राहेगाव या तीन गावात नागरी सत्कार करण्याचे आयोजिले होते. याप्रसंगी बोलताना दक्षिण मतदार संघाचा विकासासाठी कुठेही कमी पडणार नाही असे मत व्यक्त केले. नांदेड दक्षिण मतदार संघातील विकासात्मक कामे करण्यासाठी मी कुठल्याही परिस्थितीत निधी कमी पडू देणार नाही. कारण दक्षिण मतदार संघातील मतदारांनी माझ्यासारख्या शेतकऱ्याच्या पोराला संसदेत पाठवलं एवढा मोठा विश्वास त्यांनी माझ्यावर टाकला आहे. आणि माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील मुलाला आमदार करून आज संसदेत आपली सामान्य



माणसाचा आवाज उठवण्यासाठी उभं केलं आहे. त्यामुळे मी येथील जनता मायबाप यांच्या ऋणात राहून त्यांच्या विकासासाठी मी कसलीच कसर राहू देणार नाही. असे मत आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी भायगाव येथे नागरी सत्कार दरम्यान आपले मत व्यक्त केले या नागरी सत्काराचे आयोजन भायगाव नगरीचे सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायगावकर यांनी केले होते. यावेळी महायुतीचे बालाजी पाटील पुणेगावकर, उद्धव शिंदे, विनय पाटील गिरडे, संभाजी जाधव, अमोल गोडबोले, यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह गावातील बापूराव पाटील कोचार, विठ्ठल पाटील खोसडे, राम पाटील कोल्हे ,संभाजी पाटील खोसडे, पांडुरंग पाटील कोचार ,चांदू पाटील पुयड ,नामदेव खोसडे, गणेश खोसडे, भानू पाटील कोल्हे, शंकर खोसडे, नारायण कोल्हे, गंगाधर खोसडे यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती तर सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बालाजी पाटील कोल्हे यांनी केले.

## प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभार्थ्यांची नोंदणी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ जानेवारी**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात प्रपत्र ड मधील प्रतीक्षा यादीतील एक लाख २० हजार पात्र लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाली आहे. यावर्षी राज्य शासनाने नांदेड जिल्हा परिषदेला या योजनेअंतर्गत एकूण १ लाख १० हजार ३० घरकुलांचे उद्दिष्ट दिले आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी दिली. ऑनलाइन नोंदणी झालेल्या पात्र लाभार्थ्यांना लवकरच उद्दिष्टानुसार मंजुरी देण्यात येणार आहे. येत्या आठवड्यात हे उद्दिष्ट निश्चित होईल. यासाठी लाभार्थ्यांच्या आधार कार्ड, बँक खाते, जॉब कार्ड, नमुना नंबर ८ व ग्रामपंचायतीची मान्यता यासह इतर आवश्यक माहितीची नोंद करण्यात आली आहे.